१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार १७ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४३, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 43 Marathi - Daily - Mumbai, 17 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

महिलांना मिळणार ३३% आरक्षण


navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# २०२३ साली मंजूर महिला आरक्षण विधेयक पुन्हा मांडले

# लोकसभेत राजकीय फैरी! मोदींचे निवेदन! आज मतदान

■ नवी दिल्ली



**महिलांना संसदेत आणि विधानसभेत ३३ टक्के आरक्षण, मतदार संघ फेररचना आणि केंद्रशासित प्रदेश सुधारणा ही तीन विधेयके आज केंद्र सरकारने बोलावलेल्या विशेष अधिवेशनात मांडण्यात आली. यावेळी विरोधी पक्षांनी महिला आरक्षणाला पाठिंबा देताना मतदारसंघ फेरबदल ही मोदी सरकारची राजकीय खेळी असल्याचे म्हणत विरोध केला. मात्र हा विरोध महिला आरक्षणालाच आहे, असा घणाघात करणारे निवेदन पंतप्रधान मोदी यांनी केले. राजकीय श्रेय घेण्यासाठी अधिवेशन बोलावले यावरून सत्ताधारी व विरोधक यांच्यात आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडल्या. उद्या दुपारी ४ वाजता या तीनही विधेयकांवर मतदान होणार आहे.**

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आज संसदेत 'नारी शक्ती वंदन अधिनियम' वरील चर्चेदरम्यान पाऊण तास निवेदन केले. यावेळी त्यांनी विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. मोदी म्हणाले की, आपल्या देशात जेव्हा जेव्हा निवडणुका झाल्या, तेव्हा महिलांच्या अधिकारांना विरोध करणाऱ्यांना जनतेने कधीही माफ केले नाही. त्यामुळे ज्यांना या विषयात राजकारण दिसते, त्यांनी स्वतः च्या भूतकाळातील परिणामांकडे पाहावे. या विषयाला राजकीय रंग देण्याची गरज नाही. देशाची नारी शक्ती आपल्या उद्देशांकडे पाहते आणि नीयतमध्ये खोट असेल तर ती कधीही माफ करणार नाही. मी कोणत्याही पक्षाबद्दल बोलत नाही, पण जो कोणी राजकारणात पुढे जाऊ इच्छितो, त्याने हे समजून घेतले पाहिजे की, आज लाखो महिला स्थानिक पातळीवर नेतृत्व करत आहेत. मी पूर्वी संघटनेत काम करत असताना ऐकले होते की, पंचायत स्तरावर आरक्षण देणे सोपे असते, कारण त्यात स्वतःचे पद धोक्यात येत नाही. त्यामुळे तिथे ५० टक्क्यांपर्यंत आरक्षण दिले गेले. पण आता परिस्थिती बदलली आहे. आज तळागाळातील महिला सक्षम झाल्या आहेत आणि त्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची मागणी करत आहेत. आपण देशाच्या नारी शक्तीला काही देत नाही आहोत, हा त्यांचा हक्क आहे. अनेक दशकांपासून आपण त्यांना रोखून ठेवले आहे. आता प्रायश्चित्त करून त्या चुकीतून मुक्त होण्याची ही संधी आहे. काही लोकांना वाटते की यामध्ये माझा राजकीय स्वार्थ आहे. जर तुम्ही » पान ७ वर

## निशिकांत दुबेंनी आदित्य यांचे नाव घेतल्याने संताप

आज लोकसभेत उबाठाचे खासदार अरविंद सावंत निवेदन करताना म्हणाले की, आम्ही महिला आरक्षणाला कधीच विरोध केला नाही. २०२३ साली महिला आरक्षण मंजूर झाले तेव्हा दोन खासदार सोडून सर्वच्या सर्व खासदारांनी पाठिंबा दिला होता. मग आम्ही विरोधात आहोत हा खोटा प्रचार कशाला करता? आमचा विरोध हा डिलिमेटशनला आहे. तुम्ही राजकीय लाभासाठी महिला आरक्षण त्याला जोडले आहे. तामिळनाडू, पश्चिम बंगाल येथे निवडणूक सुरू असताना तुम्ही हे अधिवेशन आणले. हे अधिवेशन जून, जुलैमध्ये का आणले नाही? तुम्हाला महिलांचा आदर आहे तर या संसद इमारतीच्या उद्घाटनाला राष्ट्रपतींना का आमंत्रण दिले नाही? अयोध्या मंदिर समारंभात त्यांना आमंत्रण का दिले नाही? » पान ७ वर

## नेस्कोचा मालक कृष्णा पटेलला अटक का नाही? संदीप देशपांडेंचा सवाल

■ मुंबई

**गोरेगाव** येथील नेस्को सेंटर येथे आयोजित म्युझिक कॉन्सर्टदरम्यान एमबीएचे शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा ड्रगच्या अतिसेवनामुळे मृत्यू झाला तर एका विद्यार्थिनीची प्रकृती गंभीर आहे. या प्रकरणी नेस्कोचे मालक कृष्णा पटेल आणि लायझनिंग कंपनीचे मालक इंद्रजीत सिंह यांना अद्याप अटक का करण्यात आलेली नाही? असा सवाल संदीप देशपांडे यांनी उपस्थित केला.

मनसे नेते संदीप देशपांडे म्हणाले की, ९ टाईम्स ९ हा डीजे कॉन्सर्ट दरम्यान तीन-चार हजार लोक उपस्थित होते, मग पोलीस बंदोबस्त का नव्हता? जर पोलीस होते, तर त्यांच्या देखरेखीखाली ड्रग विक्री झाली का? आणि जर नव्हते, तर का नव्हते? नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोला या प्रकाराची माहिती होती का? कारण अशा कार्यक्रमांमध्ये ड्रग विकले जातात, ही माहिती सर्वत्र उपलब्ध आहे. याबाबत अजूनही » पान ७ वर

## चांदिवलीत ईव्हीएमची तपासणी सुरू देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच चौकशी

■ मुंबई

**चांदिवली** विधानसभा मतदार संघातील निवडणूक प्रक्रियेत वापरण्यात आलेल्या ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची सखोल तांत्रिक तपासणी आजपासून सुरू झाली आहे. बोरीवली पूर्व येथील भारतीय अन्न महामंडळाच्या राजेंद्र नगर गोदामात सकाळी ९.३० वाजता या प्रक्रियेला



सुरुवात झाली असून, ही तपासणी पुढील दोन दिवस चालणार आहे. देशात प्रथमच ईव्हीएममधील 'बर्न मेमरी' आणि 'मायक्रो कंट्रोलर' या घटकांची इतक्या सखोल पातळीवर पडताळणी होत असल्याने ही प्रक्रिया ऐतिहासिक मानली जात आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

तपासणीदरम्यान काँग्रेस नेते नसीम खान स्वतः उपस्थित होते तर शिंदे गटाचे आमदार दिलीप लांडे » पान ७ वर

## रशिया-इराणकडून तेल खरेदीची अमेरिकेने दिलेली मुदत संपली

■ नवी दिल्ली

**इराणविरूद्ध** इस्त्रायल आणि अमेरिकेने युद्ध पुकारल्यानंतर अमेरिकेने भारतासह काही देशांना इराण आणि रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या सवलतीची मुदत आता संपली आहे. याचा भारतासारख्या तिसऱ्या मोठ्या तेल आयातदार देशावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. कारण युद्ध जास्त दिवस लांबले तर भारतात इंधन तुटवड्याचे अधिक गंभीर संकट उभे ठाकणार आहे.

इराणविरूद्धच्या युद्धामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशिया आणि इराणकडून तेल खरेदी करण्याची सवलत दिली होती. ती मुदत संपली आहे. त्यामुळे आता रशियाकडून तेल खरेदी करू शकणार नाही. तर इराणकडून तेल खरेदीसाठी दिलेली मुदत येत्या रविवारी संपत आहे. ही मुदत वाढवण्यात येणार नाही, अशी अमेरिकेची भूमिका आहे. अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट » पान ७ वर



## जागतिक यकृत दिवस २०२६

# भक्कम सवयी, मजबूत यकृत

**तुमचं यकृत अचानक बिघडत नाही - ते दररोज थोडं-थोडं खराब होत असतं. बहुतेक लोकांना यकृताच्या आजाराबद्दल खरं चित्र माहिती नसतं. ते एका दिवसात होत नाही-ते हळूहळू तयार होतं. डॉक्टर म्हणून, मला रुग्ण सुरुवातीच्या टप्प्यात क्वचितच भेटतात.**

बहुतेक जण तेव्हा येतात जेव्हा समस्या वाढलेली असते-थकवा नॉर्मल वाटू लागतो, रिपोर्ट्स दुर्लक्षित होतात आणि काही नाही हेच पुढे जाऊन गंभीर आजार ठरतो.

कटू सत्य हे आहे: तुमचं यकृत एका दिवसात फेल होत नाही. ते सहन करत राहतं-जोपर्यंत ते थांबत नाही. आपण दुर्लक्ष करत असलेली शांत महामारी आज यकृताचे आजार दुर्मीळ राहिलेले नाहीत आणि ते फक्त दारूशी संबंधित नाहीत.

सर्वात वेगाने वाढणारी समस्या म्हणजे फॅटी लिव्हर, जी जीवनशैली आणि मेटाबॉलिझमशी जोडलेली आहे. हे तरुण, काम करणाऱ्या लोकांमध्येही दिसत आहे-ज्यांना स्वतःला आजारी वाटत नाही.

नाही वेदना. नाही स्पष्ट लक्षणं. नाही असा इशारा की लगेच डॉक्टरकडे जावं. पण ही शांतता सुरक्षितता नाही. ही फक्त उशीर आहे.

दररोजच्या सवयी ज्या नुकसान करत आहेत. यकृताचं नुकसान एका मोठ्या चुकीने होत नाही. ते लहान, रोजच्या सवयींमुळे होतं:

उशीरा रात्री जेवण यकृत रात्री दुरुस्ती (repair) करण्यासाठी असतं, जड अन्न पचवण्यासाठी नाही. हेल्दी साखरयुक्त पेय फ्रूट ज्यूस, स्मूदी, पॅकेज्ड ड्रिंक्स-हे सुरक्षित वाटतात.


पण अतिरिक्त साखर यकृतात फॅटमध्ये बदलते. वारंवार पेनकिलर्स घेणे, डोकेदुखी किंवा अंगदुखीसाठी घेतलेली औषधं हळूहळू यकृतावर ताण आणतात.

क्रॅश डाएट आणि अत्याधुनिक उपवास जलद वजन कमी करणं म्हणजे आरोग्य नाही.

यकृताला स्थिरता हवी असते, धक्के नाही. व्यायामाचा अभाव, तुम्ही जाड नसाल तरी चालेल-पण निष्क्रियता पुरेशी आहे फॅटी लिव्हरसाठी.

ही प्रत्येक सवय वेगळी वाटते. पण एकत्रितपणे त्या यकृतावर सतत भार टाकतात. अन्नाविषयीचे गैरसमज आणि वास्तव डाएटबाबत खूप गोंधळ आहे.

तूप वाईट नाही-अति प्रमाण वाईट आहे. फळं चुकीची नाहीत-पण ज्यूस जास्त प्रमाणात चुकीचा आहे. कार्बो





हायड्रेट वाईट नाहीत-पण असंतुलन वाईट आहे.

तुमचं यकृत ट्रेंड समजत नाही. ते फक्त मेटाबॉलिक लोड बघतं. जेव्हा तुम्ही गरजेपेक्षा जास्त खात राहता, तेव्हा अतिरिक्त ऊर्जा फॅटमध्ये बदलून यकृतात साठते. समस्या एका पदार्थाची नाही. समस्या आहे तुमचा खाण्याचा पॅटर्न. फॅटी लिव्हर कधी धोकादायक बनतं फॅटी लिव्हरला अनेकदा साधा किंवा उलटवता येणारा म्हणतात. हे अर्धवट खरं आहे.

तो पुढे जाऊ शकतो:

फॅट → सूज (inflammation) → फायब्रोसिस (scar) फासिरोसिस हा प्रवास शांत असतो. फायब्रोसिस जाणवत नाही.

सुरुवातीचा सिरोसिस कळत नाही. जेव्हा लक्षणं दिसतात-पिवळेपणा, सूज, पोटात पाणी-तेव्हा आजार बऱ्याच पुढे गेलेला असतो. धोका फॅटी लिव्हरमध्ये नाही.

धोका आहे त्याकडे वर्षानुवर्षं दुर्लक्ष करण्यात. दारू विरुद्ध साखर - खरी समस्या काय?

दारू यकृतासाठी थेट विष आहे. त्याचा परिणाम वेगाने आणि प्रमाणावर अवलंबून होतो. साखर-विशेषतः प्रोसेस्ड आणि द्रव स्वरूपात-हळूहळू नुकसान करते. ती यकृतात फॅट वाढवते.

आजचा खरा प्रश्न दारू की साखर? असा नाही.

प्रश्न आहे दोन्हीचा वापर + कमी हालचाल. एक वेगाने नुकसान करतो.

दुसरा जास्त लोकांना, हळूहळू प्रभावित करतो.

डॉक्टरकडे कधी जावं?

लक्षणांची वाट पाहणं चूक आहे. तुम्ही तपासणी करा जर: लिव्हर टेस्ट वारंवार बिघडलेल्या येतात

फॅटी लिव्हर + डायबिटीज किंवा लठ्ठपणा आहे. कारण नसताना थकवा आहे. दारू घेत असाल आणि रिपोर्ट्स नॉर्मल नाहीत. सगळं ठीक आहे असं सांगितलं जातं पण स्पष्ट कारण नाही.

नॉर्मल म्हणजे नेहमी सुरक्षित असं नसतं. हलका त्रास म्हणजे हलकाच राहील असं नाही.

यकृतासाठी खरंच काय काम करतं कोणताही जादुई उपाय नाही. शॉर्टकट नाही. जे काम करतं ते साधं आहे: वेळेवर जेवण साखरयुक्त पेय आणि प्रोसेस्ड फूड कमी करणं, नियमित व्यायाम औषधांचा समजून वापर वेळोवेळी योग्य तपासणी हे साधं वाटतं. पण हेच प्रभावी आहे.

शेवटचं सत्य तुमचं यकृत तुमच्याकडे लक्ष मागत नाही. ते शांतपणे काम करत राहतं-जोपर्यंत उशीर होत नाही.

जागतिक यकृत दिवस हा फक्त जागरूकतेचा दिवस नाही. तो जबाबदारीची आठवण आहे. कारण निरोगी आणि आजारी यकृत यामधला फरक नशिबावर नसतो. तो तुमच्या सवयींवर अवलंबून असतो.

**- डॉ. चेतन कलाल**
असोसिएट डायरेक्टर, हेप्टोलॉजी आणि ट्रान्सप्लान्ट मेडिसिन

## अश्विनी भिडेंनी पदभार स्वीकारताच उपायुक्त-सहाय्यक आयुक्तांच्या बदल्या

■ मुंबई



**मुंबई** महानगरपालिकामध्ये प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल करण्यात आले असून नव्याने पदभार स्वीकारलेल्या अश्विनी भिडे यांनी अवघ्या १५ दिवसांतच अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका लावला आहे. आयुक्त पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर भिडे यांनी सहाय्यक आयुक्त, सहआयुक्त आणि उपायुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. या निर्णयामुळे महापालिकेतील प्रशासनात वेग आणि कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. या फेरबदलांमध्ये उपप्रमुख अभियंता संवर्गातील जितेंद्र घोराडे यांची बी विभागात पूर्णकालिक सहाय्यक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बी विभागातील सहाय्यक आयुक्त योगेश देसाई यांची डी विभागात बदली करण्यात आली आहे. तसेच सी विभागातील सहाय्यक आयुक्त संतोष साळुंखे यांची डी विभागात नियुक्ती करत त्यांच्याकडे अतिक्रमण निर्मूलन (शहर) विभागाचा अतिरिक्त पदभार सोपवण्यात आला आहे.

याशिवाय, बाजार विभागातील सहाय्यक आयुक्त अलका ससाणे यांची सी विभागात अतिरिक्त कार्यभारासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वीही आयुक्तांनी चार सहाय्यक आयुक्तांच्या बदल्या केल्या होत्या. अवघ्या १५ दिवसांत झालेल्या या मोठ्या फेरबदलांमुळे महापालिकेच्या कामकाजात अधिक गतिमानता येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मुरबाड शहापूर तालुक्यात नवोदय विद्यालयासाठी जागेचा शोध सुरू

**शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण**

■ मुरबाड

**ठाणे** जिल्हा विभागणी होण्यापूर्वी पालघर येथे सीबीएससी बोर्डाचे जवाहर नवोदय विद्यालय हे एकमेव विद्यालय अस्तित्वात होते, आता ठाणे जिल्हा विभाजनानंतर आता ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व शहापूर तालुक्यात नव्या नवोदय विद्यालय निर्मितीसाठी जागेचा शोध सुरू असून मुरबाड व शहापूर तालुक्यात जागा उपलब्ध झाल्यास ठाणे जिल्ह्याला नवे विद्यालय मिळणार आहे.

विविध क्षेत्रात प्राविण्य व प्रशिक्षण घेण्यासाठी दरवर्षी या नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी सरकार कडून परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत उत्तीर्ण होऊन नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी पात्र ठरल्यास मुलांना घडविण्याचे काम या विद्यालयात केले जाते त्यामुळे मुरबाड शहापूर या ठाणे जिल्ह्यात असे विद्यालय आल्यास शिक्षणाचा नवा प्रवाह निर्माण होणार असून लवकरात लवकर जागा उपलब्ध झाल्यास आगामी काळात पालघरसह मुरबाड व शहापूर असा नवा पर्याय मिळणार असल्याने शैक्षणिक क्षेत्रात आनंद व्यक्त केला जात आहे.

## पनवेलमध्ये अग्निशमन सेवा सप्ताह! व्यापक जनजागृती उपक्रम

**पनवेल-** महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत २० एप्रिलपर्यंत अग्निशमन सेवा सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा होणार आहे. या सप्ताहाचा शुभारंभ मंगळवारी कळंबोली अग्निशमन केंद्र या ठिकाणी शहीद जवानांना श्रद्धांजली देऊन करण्यात आला. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अरविंद मांडके, माजी मुख्य अग्निशमन अधिकारी एमआयडीसी, अग्निशमन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई बंदरात झालेल्या भीषण स्फोट दुर्घटनेत शहीद झालेल्या अग्निशमन जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा सप्ताह साजरा केला जातो. यानिमित्त पनवेल महापालिका नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. निवासी इमारती, कारखाने, गोदामे, रुग्णालये व मॉल्स या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन नागरिकांना अग्निसुरक्षा उपाययोजनांचे प्रात्यक्षिक, अत्याधुनिक अग्निशमन साहित्याचे प्रदर्शन तसेच अग्निशमन विभागाच्या सुसज्ज वाहनांची रॅली काढण्यात येणार आहे.

## मुंबईतील नाट्यगृह भाडेवाढीला तत्काळ स्थगिती देण्याची मागणी

**शिंदे शिवसेनेचे पालिका आयुक्तांना निवेदन**

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेने १ एप्रिलपासून शहरातील नाट्यगृहांच्या भाड्यात सुमारे ४ हजार रुपयांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या भाडेवाढीला निर्मात्यांनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे शिवसेनेचे युवासेना सरचिटणीस आणि माजी नगरसेवक अमेय घोले यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन ही भाडेवाढ तातडीने स्थगित करण्याची मागणी केली आहे.



अचानक केलेली ही दरवाढ मराठी संस्कृतीच्या जडणघडणीत अडथळा ठरू शकते. त्यामुळे ती तत्काळ मागे घ्यावी. मोठ्या व्यावसायिक नाटकांप्रमाणेच लहान संस्थांनाही व्यासपीठ उपलब्ध करणे गरजेचे आहे. नाट्यगृहे ही केवळ उत्पन्नाचे साधन नसून ती कलेची मंदिरे आहेत, याचे भान प्रशासनाने ठेवावे. मराठी रंगभूमी ही अनेक कलाकार आणि तंत्रज्ञांच्या उपजीविकेचे साधन आहे. अशा प्रकारे भाडेवाढ केल्यास नाट्यप्रयोगांवर प्रतिकूल परिणाम होईल. प्रशासनाने कलेचा विचार करून या भाडेवाढीला तत्काळ स्थगिती द्यावी, अशी मागणी युवासेना सरचिटणीस अमेय घोले यांनी आपल्या निवेदनात केली आहे.

## हेरगिरी प्रकरणी अधिकारी प्रदीप कुरुलकरचा जामीन फेटाळला



■ मुंबई

**संरक्षणविषयक** संवेदनशील माहिती पाकिस्तानी गुप्तहेराला पुरवण्याचा आरोप असलेला संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचा (डीआरडीओ) वरिष्ठ अधिकारी प्रदीप कुरुलकर याचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावला.

२०२३ मध्ये उघडकीस आलेल्या हनी ट्रॅप प्रकरणाशी संबंधित पाकिस्तानी गुप्तहेराला संरक्षणविषयक माहिती पुरवल्याचा आरोप कुरुलकरवर आहे. त्याच्या जामीन अर्जावर न्या.एस.जी. डिगे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी वरिष्ठ पदावर असूनही कुरुलकर याने एक वर्षाहून अधिक काळ पाकिस्तानसमधील गुप्तहेराशी संवाद साधत संरक्षणविषयक महत्त्वाची माहिती दिली, असे नमूद करत खंडपीठाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला. कुरुलकर निवृत्त अधिकार असला तरी तो त्याचे माजी सहकारी असलेल्या साक्षीदारांवर प्रभाव टाकू शकतो. तसेच जामीन मिळाल्यास आरोपी फरार होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे निरीक्षण यावेळी खंडपीठाने नोंदवले. सुनावणीदरम्यान, संवेदनशील म्हटली जात असलेली माहिती आधीच सार्वजनिक करण्यात आली होती. त्यामुळे ती माहिती दिल्याने गोपनीयतेचा भंग करण्यासंबंधीच्या ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट अन्वये गुन्हा ठरत नाही, असा युक्तिवाद कुरुलकरच्या वकिलांनी केला होता. खंडपीठाने तो अमान्य केला.

## वसाहतीतील भूभाडे व सेवाशुल्क वसुलीसाठी म्हाडा ॲक्शन मोडवर

■ मुंबई

**म्हाडा** कोंकण गृहनिर्माण मंडळाच्या विविध वसाहतीतील गाळेधारक व भूखंडधारक यांच्याकडील थकीत असलेले भूभाडे व सेवा शुल्काची थकीत रक्कम वसुलीसाठी कोंकण मंडळ आता ॲक्शन मोडवर आली आहे. त्यासाठी भाडेवसुलीकरांची टीम तयार केली जाणार आहे.

एमएमआर रिझनमध्ये जवळपास म्हाडाच्या ४० वसाहती आहेत. काही लोकांकडे भूभाडे व सेवाशुल्काची वर्षानुवर्षे रक्कम थकीत आहे. म्हाडाची ऑनलाईन प्रणाली सेवा उपलब्ध असताना अनेक जणांनी अशा रक्कमा भरणा करण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ करतात. आता भूभाडे व सेवा शुल्काची रक्कम वेळेत व मुदतीत भरता यावी यासाठी प्रत्येक कोंकण मंडळाच्या म्हाडा वसाहतीत महिन्यातून दोन वेळा वसाहतींच्या कार्यालयात भाडेवसुलीकार प्रत्यक्ष हजर राहून भूभाडे व सेवा शुल्कांची रक्कम वसुल करणार आहे. ही जबाबदारी भाडेवसुलीकरांवर सोपविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे.

## सरनाईकांच्या लोकदरबारात मेहता विरोधात तक्रार

■ भाईंदर

**परिवहन** मंत्री प्रताप सरनाईक यांनी आयोजित केलेल्या लोक दरबारात एक तक्रार भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांच्या विरोधात आली. गुरुवारी भाईंदर येथील बाळासाहेब ठाकरे कला दालनात लोकदरबाराचे आयोजन केले होते.

लोकदरबारात एकूण २७३ नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या. यात सर्वाधिक तक्रारी महापालिकेच्या कारभाराशी संबंधित होत्या. एका ८२ वर्षीय तक्रारदाराने स्थानिक भाजपा आमदार नरेंद्र मेहता यांच्या सेव्हन इलेव्हन आणि सोहम डेव्हलपर कंपनी विरोधात अतिक्रमण केल्याची तक्रार केली. संबंधित जागेची प्रशासकीय अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी करून योग्य तो मार्ग काढण्याचे निर्देश प्रताप सरनाईक यांनी पालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांना दिले.

## होळकरांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त २५ एप्रिलपासून गोदावरी ते नर्मदा जलयात्रा

■ नाशिक

**पुण्यश्लोक** अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त गोदावरी ते नर्मदा जलयात्रेचे आयोजन २५ ते २९ एप्रिल दरम्यान करण्यात आले आहे. या यात्रेचे उद्घाटन त्र्यंबकेश्वर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

ते पुढे म्हणाले की, अशीच एक जलयात्रा चोंडी येथूनही सुरू होणार आहे. चोंडीहून सुरू होणारी आणि त्र्यंबकेश्वरहून निघणारी जलयात्रा धुळे येथे एकत्र येईल आणि त्यानंतर महेश्वर (मध्य प्रदेश) कडे एकत्रितपणे प्रस्थान करेल.

त्र्यंबक येथे होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास विविध आखाड्यांचे प्रमुख, संत तसेच ५०० हून अधिक वारकरी उपस्थित राहणार आहेत. पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना जलयात्रेचे स्वागत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## डोंबिवलीत घराला आग ७० वर्षीय आजी बचावल्या

■ डोंबिवली

**डोंबिवली** पूर्वेकडील देसलेपाडा परिसरात राहणाऱ्या शकुंतला गायकवाड (७०) यांच्या घराला लागलेल्या आगीत संपूर्ण घरसामान जळून खाक झाले. सुदैवाने त्या सत्संगासाठी बाहेर गेल्याने जीवितहानी टळली. ही घटना रात्रीच्या सुमारास घडली. आगीत घरातील सर्व साहित्य, मोबाईल फोन, अन्नधान्य तसेच सुमारे २५ हजार रुपयांची रोकड जळून नष्ट झाली. याशिवाय, गायकवाड यांची नात दीपांजली हिची महत्त्वाची शैक्षणिक कागदपत्रेही आगीत नष्ट झाली आहेत. त्यामुळे कुटुंबियांना मोठा आर्थिक आणि मानसिक धक्का बसला आहे.

## वाढत्या महागाईच्या काळातही रोजगार हमीची मजुरी 'जैसे थे'

■ पालघर

**वाढत्या** महागाईमुळे ग्रामीण भागात आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. मनरेगा अर्थात रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचे दरही यंदा 'जैसे थे' ठेवण्यात आले आहेत. महाराष्ट्रात अनेक मजुरांना प्रतिदिन अवघ्या ३१२ रुपयांवर काम करावे लागत आहे. ही मजुरी महागाईच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. महागाई वाढली तरी या मजुरीत कोणतीही वाढ झालेली नाही.

सध्या महाराष्ट्रात मनरेगा अंतर्गत मजुरांना दररोज ३१२ रुपये इतकी मजुरी दिली जात आहे. दरवर्षी १ एप्रिलपासून मजुरीत वाढ करण्याची परंपरा आहे. यंदा ही परंपरा मोडीत निघाली आहे. केंद्र सरकारकडून कोणतीही वाढ जाहीर न झाल्याने



मजुरीच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. ग्रामीण भागात उन्हाळ्यात शेतीची कामे आटोपल्यानंतर मोठ्या प्रमाणात मजूर मनरेगाच्या कामांकडे वळतात. जलसंधारण, हजारो कामे प्रलंबित असून राज्यात दररोज फळबाग लागवड, ग्रामीण रस्ते बांधणी अशी १० ते १५ लाख मजूर या योजनेत कार्यरत असतात. यामुळे भविष्यात मनरेगा कामांकडे मजुरांचा प्रतिसाद कमी होण्याची शक्यता आहे. मागील काही वर्षांतील मजुरी दराचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, २००६-०७ : ६५ रुपये, २०१०-११: १०० रुपये, २०१५-१६ : १८१ रुपये; २०२०-२१:२३८ रुपये, २०२५-२६:३१२ रुपये, २०२६-२७:३१२ रुपये असा आहे. यंदा कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



## अभिनेत्री तमन्ना भाटियाची याचिका मद्रास उच्च न्यायालयाने फेटाळली

■ चेन्नई

**पॉवर** सोप्स लिमिटेड या साबण उत्पादक कंपनीकडून नुकसान भरपाईपोटी १ कोटी रुपये वसूल करण्यासाठी अभिनेत्री तमन्ना भाटिया हिने केलेली याचिका मद्रास उच्च न्यायालयाने फेटाळली.

तमन्नाने पॉवर सोप्स कंपनीशी साबणाच्या जाहिरातीसाठी एक वर्षाचा करार केला होता. या कराराची मुदत संपल्यानंतरही कंपनीने आपला चेहरा साबणाची जाहिरात करण्यासाठी वापरला, असा तमन्नाचा दावा होता. त्यासाठी तिने मद्रास उच्च न्यायालयात १ कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. त्या याचिकेवर एकलपीठासमोर सुनावणी होऊन तिची याचिका फेटाळण्यात आली होती. एकलपीठाच्या त्या निर्णयाला तमन्नाने पुन्हा उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवर न्या.पी. वेलमुरुगन आणि न्या. क. गोविंदराजन तिलकवाडी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी खंडपीठाने एकलपीठाने दिलेला निर्णय योग्य असल्याचे सांगत तमन्ना भाटियाची आव्हान याचिका फेटाळली.

## राज्यातील एसटी महामंडळाचे तब्बल २३ विभाग तोट्यात

**परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांची माहिती**

■ मुंबई

**एसटी** महामंडळाचे ३१ पैकी २३ विभाग तोट्यात असून, महामंडळाला २०२५-२६ या आर्थिक वर्षात ५९१ कोटी रुपयांचा फटका बसला आहे. विशेष म्हणजे दररोज सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांचा तोटा होत आहे. हा तोटा कमी करण्याचे आणि बसेसचा कार्यक्षम वापर करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. एसटी मुख्यालयात घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, या आर्थिक वर्षात एसटीचे एकूण चालनीय उत्पन्न ११४७५ कोटी रुपये इतके नोंदविण्यात आले, तर खर्च १२०६६ कोटी रुपये झाला. परिणामी महामंडळाला तब्बल ५९१ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. दैनंदिन सरासरी उत्पन्न ३१ कोटी ४० लाख रुपये असताना खर्च ३३ कोटी रुपये इतका झाला असून दररोज सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांचा तोटा होत आहे. राज्यातील ३१ विभागांपैकी केवळ ८ विभाग नफ्यात असून उर्वरित २३ विभाग तोट्यात आहेत. मागील आर्थिक वर्षात जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा हे ८ विभाग नफ्यात होते. मात्र उर्वरित २३ विभागापैकी नाशिक, कोल्हापूर, नागपूर, रत्नागिरी, सातारा आणि ठाणे या मोठ्या विभागांचा वाढता तोटा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे.

## धारावी कोळीवाडा सीमांकनसाठी आता उच्चस्तरीय समिती गठीत

**महसूल विभागाचा शासन निर्णय जारी**

■ मुंबई

**धारावी** पुनर्विकास प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत संवेदनशील ठरलेल्या धारावी कोळीवाड्याच्या सीमांकनाचा तिढा आता सुटण्याची चिन्हे दिसत आहेत. कारण धारावी कोळीवाड्याच्या सीमांकनासाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. महसूल विभागाने काल यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला.

मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयाने २०१८मध्ये धारावी कोळीवाड्याचे सविस्तर सर्वेक्षण करून मोजणी नकाशा तयार केला होता. या नकाशात दर्शवण्यात आलेल्या सीमा अंतिम करण्याच्या दृष्टीने ही समिती तांत्रिक आणि कायदेशीर पडताळणी करणार आहे. विशेष म्हणजे या मोजणी नकाशावर धारावी पुनर्विकास प्रकल्पाने काही हरकती नोंदवल्या आहेत. या हरकतींची शहानिशा करून सुवर्णमध्य काढण्याची जबाबदारी या समितीवर सोपवण्यात आली आहे.

या समितीत सदस्य म्हणून जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख पुणे, मुंबई पालिकेचे अतिरिक्त आयुक्त, मुंबई शहर, उपनगरचे जिल्हाधिकारी, मुंबई महापालिकेचे शहर अभियंता, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाचे संचालक, मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त यांचा समावेश आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# उष्णतेची लाटच नव्हे तापमानाचा प्रकोप

राज्यभरात केवळ उष्णतेच्या लाटा आल्या आहेत असे नव्हे तर आतापर्यंतच्या उन्हाळ्यापैकी हा सर्वात मोठ्या उष्णतेचा प्रकोप म्हणावा लागेल. निम्म्यापेक्षा जास्त महाराष्ट्रामध्ये ४० अंश सेल्सिअसपर्यंत तापमान गेलेले आहे. देशभरात तापमानाची लाट आलेली आहेच. एकूणच देशातील दहा शहरं ही सर्वाधिक तापमानाची नोंदली गेली आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे या दहा शहरांमध्ये सात शहरं महाराष्ट्रातली आहेत. त्यामध्ये संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, अकोला आणि वर्धा या शहरांचा समावेश होतो. उत्तर महाराष्ट्रातही उष्णता चांगलीच भाजून काढते आहे. जळगाव, धुळे या ठिकाणी ४३ अंश सेल्सिअसवर तापमान पोहोचले आहे. हवामानाच्यादृष्टीने थंड मानल्या जाणाऱ्या नाशिकलासुद्धा तापमानाचा पारा ३९ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. देशातलं सर्वाधिक तापमान हे नुकतंच अकोल्यामध्ये नोंदलं गेलं जे ४४.२ सेल्सिअस होतं. वर्ध्यामध्ये अचानक वाढलेल्या या तापमानाचा फटका विद्यार्थ्यांना बसू नये. म्हणून शाळांना सुट्टी दिली गेली आहे. अकोल्यात या उष्णतेच्या प्रकोपाचे दोन बळीसुद्धा गेलेले आहेत. मालेगावमध्येसुद्धा ४३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झालेली आहे. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये तापमानाचा उद्रेक जाणवत असतो. परंतु प्रत्येक उन्हाळ्यामध्ये त्याचे स्वरूपही अधिक तीव्र होत चालल्याचेही पाहायला मिळते आहे. कारण हे तापमान केवळ वातावरणातली उष्णता वाढवत नाही तर प्रचंड वेगाने पाण्याचे बाष्पीभवन होते. स्वाभाविकपणे नद्या, धरणं, जलाशय इथले पाणी कमी होते. समुद्रातसुद्धा पाण्याच्या उष्णतेतून निर्माण होणारी हवा ही अधिक त्रासदायक ठरते आहे. जगाच्या काही भागात समुद्राच्या पाण्यातून निर्माण होणारी ही उष्णता 'अलनिनो' म्हणून ओळखली जाते. याचा अर्थ आग ओकणारा सूर्य आणि इकडे समुद्र किंवा जलशयांमधून तापणाऱ्या पाण्याच्या वाफेचे चटके असे हे दुहेरी संकट दरवर्षी वाढते आहे. यावर्षी एप्रिलच्या मध्यालाच तापमानाने विक्रमी उच्चांक गाठायला सुरुवात केलेली आहे. प्रत्यक्ष मे महिन्यामध्ये काय परिस्थिती राहील याचा साधारणपणे अंदाज येऊ शकतो.

### अवकाळीचीदेखील शक्यता

हवामानतज्ज्ञांच्या मते ही उष्णतेची लाट पुढच्या चार पाच दिवसांपर्यंत राहील नंतर ती कमी होण्याची शक्यता आहे. कारण पश्चिम बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने वीस ते पंचवीस एप्रिलच्या दरम्यान काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता वर्तवली गेली आहे. या अवकाळी पावसामुळे हवामानात तात्पुरता गारवा येतो ही गोष्ट खरी आहे. परंतु वैशाखातला हा उन्हाचा कडक वणवा मातीसकट झाडाझुडुपांनाही भाजून काढतो. पाऊस पडल्यानंतर कडक उन्हामुळे निर्माण होणारी उष्णता ही आणखीनच त्रासदायक ठरते. जगभरच वाढत्या तापमानाचे संकट दरवर्षी अधिक गंभीर होत चालले आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत. परंतु वाढणाऱ्या तापमानाचा वेग आणि केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा वेग यामध्ये जमीन आसमानाचे अंतर आहे. कारण औद्योगिकरण थांबवता येत नाही. दरवर्षी वाढणाऱ्या वाहनांची संख्या कमी करता येत नाही. आतमधून गारेगार असणारी ही वाहनं बाहेर मात्र प्रचंड गरम हवा सोडत असतात. त्यातून वातावरणात अधिक उष्णता निर्माण होते. नागरीकरणाचा प्रचंड वेगही जगातला कुठलाच देश थांबवू शकत नाही. या नागरीकरणासाठी केली जाणारी वृक्षतोड किंवा वेगवेगळ्या विकासकामांसाठी होणारी जंगलतोड पर्यावरणाचा समतोलही बिघडवत आहेत. मोठमोठ्या महानगरांमधून तयार होणारी सिमेंटची जंगलं हीसुद्धा उष्णता आणि तापमानालाच प्रोत्साहन देणारी ठरतात. याचा अर्थ तापमान रोखण्यासाठी केल्या जात असलेल्या उपाययोजना अगदीच मामुली स्वरूपाच्या ठरतात. मात्र तापमान वाढवणारे हे सगळे प्रकार एकूणच मनुष्यजीवनाची कसोटी पाहणारी किंवा नव्या संकटांना आमंत्रण देणारीच म्हणावी लागतात. आज जरी सरकारी पातळीवरून वृक्षारोपण किंवा अपारंपारिक ऊर्जा वापरण्याला प्रोत्साहन दिले जात असले किंवा प्रदूषण रोखण्यासाठीदेखील प्रयत्न होत असले तरी सूर्यनिर्मित उष्णता ही दरवर्षी वाढते आहे. त्यामागची खगोलीय किंवा वैज्ञानिक कारणं अधिक महत्त्वपूर्ण ठरतात. त्याचादेखील सखोल अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.

### ट्रान्सफॉर्मरला कुलरचा थंडावा

यावेळची उष्णता ही कशी नेहमीपेक्षा अधिक भाजून काढणारी आहे. याचं एक काहीसं विचित्र अनपेक्षित उदाहरण महाराष्ट्रातल्या धुळे शहरामध्ये पाहायला मिळते आहे. इथल्या वीज मंडळाच्या उपकेंद्रातील ट्रान्सफॉर्मवरही वाढत्या उन्हाचा परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्या ट्रान्सफॉर्मरच्या आजुबाजूला कुलर लावले गेले आहेत. कल्पना कोणत्या अभियंत्याच्या डोक्यातून स्फुरली असेल माहीत नाही. परंतु रणरणत्या उन्हात आधीच तापलेल्या ट्रान्सफॉर्मरला कुलरमधून थंडावा देण्याचा हा प्रकारही राज्याच्या तापमानाच्या आणि वीज मंडळाच्या इतिहासात पहिलाच ठरतो. धुळ्यातले तापमान ४२ अंशांवर गेले असताना हा खबरदारीचा उपाय केल्याचे सांगितले जाते. परंतु अशा प्रकारची जर परिस्थिती उद्भवणार असेल तर राज्यातल्या सगळ्याच वीज उपकेंद्रांमध्ये एसी किंवा कुलर बसवण्याची वेळ येऊ शकते. खरोखरच अशी परिस्थिती आहे का, यानिमित्ताने कुलर बनवणाऱ्या कंपन्यांचे उखळ पांढरे करायचे आहे. परंतु असा उपाय करण्याची वेळ येणे याचा अर्थ वाढते तापमान आता सहन करण्याच्या पलिकडे जाऊ लागले आहे. सर्वसामान्य माणसाने खबरदारी म्हणून दुपारच्या वेळात बाहेर न पडणे, शक्यतो पांढरे कपडे वापरणे, दर तासाने पाणी पित राहणे, अशा प्रकारच्या छोट्या छोट्या उपाययोजना केल्या पाहिजेत. दरवर्षी वाढत चाललेली ही तापमानाची समस्या चिंताजनक आहेच. परंतु त्याची तीव्रता कमी करण्यासाठी अधिक अभ्यासपूर्ण संशोधनाची आणि उपायांची आवश्यकता आहे. सरकारने यासाठी अभ्यासगट किंवा तज्ज्ञ समिती नेमून या संकटाचा मुकाबला केला गेला पाहिजे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

दुसऱ्याचं आयुष्य आपल्याला खूप सहज आणि सोपं वाटतं. कारण त्यात आपली भूमिका फक्त प्रेक्षकाची असते.

## पंचांग

**शुक्रवार, १७ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



* चैत्र अमावास्या
* नक्षत्र - रेवती

-: जन्मराशी :-
००-०१ ते १२-०२ मीन
१२-०३ ते २४-०० मेष

रवी उदय- ०६-२१
रवी अस्त- १८-४५

**दर्श अमावास्या, अमावास्या समाप्ती सायं. ५.२२, वज्रेश्वरी पालखी यात्रा-वसई**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### उपवासाचे सांडगे



★ **साहित्य** :- साबुदाणा १ किलो, बटाटा पाऊण किलो, १० ते १५ हिरव्या मिरच्या, २ टेबलस्पून जिरेपूड, चवीनुसार मीठ आणि लाल तिखट.

★ **कृती** :- सर्वप्रथम साबुदाणा २ ते ३ वेळा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर साबुदाणा बुडेल एवढं त्यात साधं पाणी घाला आणि १० ते १२ तास साबुदाणा पाण्यात चांगला भिजू द्या. भिजवलेला साबुदाणा एका चाळणीमध्ये काढून घ्या. जेणेकरून त्यातलं जास्तीचं पाणी निघून जाईल. यानंतर बटाटेही उकडून घ्या. उकडून घेतलेला बटाटा, साबुदाणा एका पसरट भांड्यात एकत्र करा. त्यामध्ये मिक्सरमधून वाटून घेतलेल्या हिरव्या मिरच्या, जिरेपूड, चवीनुसार तिखट आणि मीठ घाला. सगळं मिश्रण अगदी एकजीव करून घ्या. यानंतर हाताला थोडं शेंगदाणा तेल किंवा मग पाणी लावून वडे तोडा. हे वडे छान कडकडीत वाळू द्या आणि नंतर डब्यात भरून ठेवा. वर्षभर चांगले टिकतील. उपवासाच्या दिवशी चटपटीत खावेसे वाटले की, हे सांडगे पटकन तळून खाऊ शकता.




# पंजाबने मुंबईला सात विकेटने नमवले

## क्विंटन डी कॉकची शतकी खेळी निष्फळ



**सलामीवीर प्रभसिमरन सिंगने नाबाद ८० धावा आणि कर्णधार श्रेयस अय्यरने ६६ धावांची वादळी खेळी केल्यामुळे पंजाब किंग्सने मुंबई इंडियन्सला ७ विकेटने सहज पराभूत केले. या विजयासह पंजाबने आयपीएलच्या गुणतालिकेत ९ गुणांसह अव्वल स्थानावर झेप घेतली. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या २४ व्या सामन्यात क्विंटन डी कॉकच्या शतकी खेळाच्या बळावर मुंबईने ६ बाद १९५ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात पंजाबने १६.३ षटकांत ३ बाद १९८ धावा ठोकून या स्पर्धेत चौथा विजय मिळवला.**

■ मुंबई

**प्रथम** फलंदाजी करणाऱ्या मुंबईचा रायन रिकलटन आणि सूर्यकुमार यादव अनुक्रमे २ आणि ० धाव करून झटपट तंबूत परतल्यानंतर क्विंटन डी कॉक आणि नमन धीर यांनी पंजाबच्या गोलंदाजांवर चौफेर हल्ला चढवून मुंबईचा डाव सावरला. या जोडीने संघाची धावसंख्या १३.२ षटकांत २ बाद १३४ वर पोहोचवली. मात्र पुढील चेंडूवर नमन धीरला शशांक सिंगने बाद केले. त्याने ३१ चेंडूंत ५० धावा केल्या. मात्र दुसऱ्या बाजूने क्विंटन डी कॉकने धडाकेबाज खेळी सुरुच ठेवत ५३ चेंडूंत १०० धावा केल्या. कर्णधार हार्दिक पंड्या१२ चेंडूंत १४ धावा करून झेलबाद झाला. त्यामुळे मुंबईची धावसंख्या १७ षटकांत ४ बाद १७५ वर पोहोचली. अर्शदीप सिंगने शेर्फेन रूदरफोर्डचा (१) त्रिफळा उडवला. मग टिळक वर्मा ८ धावांवर धावचित झाला. शेवटी क्विंटन डी कॉक ६० चेंडूंत ७ षटकार आणि ८ चौकारांसह ११२ धावा करून नाबाद राहिला. त्याच्या खेळीमुळे मुंबईने निर्धारित षटकात ६ बाद १९५ धावांपर्यंत मजल मारली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना पंजाबचा पहिला बळी २७ धावांवर सलामीवीर प्रियांश आर्यच्या रुपात गेला. त्याने ९ चेंडूंत १५ धावा केल्या. कूपर कॉनोलीच्या साथीत प्रभसिमरन सिंगने संघाचा डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र कॉनोली १२ चेंडूंत १७ धावा करून झेलबाद झाला. प्रभसिमरनने आपली आक्रमक खेळी सुरू ठेवली. त्याला श्रेयस अय्यरनेही चांगली साथ दिली. मग प्रभसिमरनने या हंगामातील २३ चेंडूंत दुसरे अर्धशतक झळकावले. त्यानंतर श्रेयस अय्यरनेही ३१ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले.

दोघांनी जोरदार फटकेबाजी करून मुंबईच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. १६ व्या षटकांच्या पहिल्या दोन चेंडूंवर २ षटकार ठोकल्यानंतर श्रेयस अय्यरचा नमन धीरने अफलातून झेल घेतला. प्रभसिमरनने ३९ चेंडूंत नाबाद ८० धावा आणि मार्कस स्टोइनिसने नाबाद १० धावांची खेळी केली. त्यांच्या खेळीमुळे पंजाबने १६.३ षटकांत विजयी आव्हान गाठले.

## आज गुजरात आणि कोलकाता यांच्यात लढत

■ अहमदाबाद

**अहमदाबादच्या** नरेंद्र मोदी स्टेडियमवर उद्या पार पडणाऱ्या आयपीएलच्या २५ व्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात लढत होणार आहे. हा सामना जिंकून गुजरात आयपीएलच्या गुणतालिकेत चौथ्या स्थानावर झेप घेण्याचा प्रयत्न करणार आहे, तर ५ सामने खेळूनही कोलकाताला आतापर्यंत एकही विजय मिळवता आला नाही. त्यामुळे कोलकाताचा संघ गुजरातला पराभूत करण्यासाठी सज्ज झाला आहे.

गुजरात आतापर्यंत ४ सामने खेळले आहेत. त्यातील २ सामन्यांत गुजरातने विजय मिळवला, तर २ सामन्यांत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे गुजरात आयपीएलच्या गुणतालिकेत ४ गुणांसह ६ व्या स्थानावर आहे. कोलकाता आतापर्यंत ५ सामने खेळले आहेत. त्यात ४ सामन्यांत कोलकाताचा पराभव झाला आहे, तर एक सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे कोलकाता गुणतालिकेत १ गुणासह शेवटच्या स्थानावर आहे. आयपीएलमध्ये दोन्ही संघांत एकूण पाच सामने खेळले गेले आहेत. गुजरातने यापैकी तीन सामने जिंकले, तर कोलकाता नाईट रायडर्सनेही एकदा विजय मिळवला आहे.

## डोंबिवलीत २९ एप्रिलला कॅरम स्पर्धा होणार

■ ठाणे

**डोंबिवली** येथील दत्तनगर उत्कर्ष मंडळाच्या विद्यमाने २९ एप्रिल रोजी राष्ट्रीय कॅरमपटू स्व. जान्हवी मोरे स्मृती प्रित्यर्थ १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेचे २९ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा शास्त्री हॉल, दत्तनगर, डोंबिवली, पूर्व येथे होणार आहे. २० एप्रिलपर्यंत प्रवेशिका स्वीकारण्यात येतील.

## होतकरू, मिडलाईन, जय भवानी संघांची आगेकूच

■ ठाणे

**होतकरू,** मिडलाईन, जय भवानी, बालगोपाळ यांनी पुरुष गटात आणि स्नेहविकास, ओम वर्तकनगर, नवशक्ती यांनी महिला गटात श्री मावळी मंडळाने आयोजित केलेल्या ७३ व्या कबड्डी स्पर्धेत आपली आगेकूच सुरू ठेवली. पुरुष गटात डॉन बास्कोचा जीत सिंग, तर महिला गटात एसआयईएसची आस्था सिंग आजच्या दिवसांतील उत्कृष्ट खेळाडू ठरले. ठाणे चरई येथील श्री मावळी मंडळाच्या भव्य पटांगणावर सुरू असलेल्या दुसऱ्या दिवशी पुरुष गटात ठाण्याच्या होतकरू मंडळाने उपनगरच्या केदारनाथ मंडळावर २८-१९ अशी मात केली. पूर्वार्धात ९-१० अशा पिछाडीवर पडलेल्या होतकरूने उत्तरार्धात आपला खेळ गतिमान केला आणि लोण



देत सामना आपल्या बाजूने झुकविला. मिडलाईन स्पोर्ट्सने अभिषेक भोईर, धीरज बैलमारे, अजित चव्हाण यांच्या चतुरस्त्र खेळाने अष्टविनायक संघाने ३१-२३ असे नमविले.

जय भवानी तरुण मंडळाने चिंतामणी स्पोर्ट्सला ३४-२५ असे पराभूत केले. चिंतामणीचे हर्षल शहा, विशाल सणस उत्तम खेळले. बालगोपाळ मित्र मंडळाने ओवळी मंडळावर ३४-३१ असा विजय मिळविला. पहिल्या डावात चुरशीची लढत झाल्यामुळे मध्यंतरला गुणफलक १४-१४ अशा बरोबरीत होता. मध्यंतर नंतर बाळ गोपाळच्या फाजल नाडर, राज चौधरी, अतिश जीत यांनी आपला खेळ उंचावत संघाला निसटता विजय मिळवून दिला. महिला गटात उपनगरच्या स्नेहविकास मंडळाने ठाण्याच्या अश्वमेघ स्पोर्ट्सला २६-२५ असे चकविले. विश्रांतीला लोण देत १४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या स्नेहविकासला नंतर मात्र अश्वमेघ संघाने कडवी लढत दिली.

## युवा पलटन, मध्य रेल्वे, मुंबई पोस्टल, भारत पेट्रोलियम संघ बाद फेरीत

■ मुंबई

**युवा** पलटन, मुंबई पोस्टल, भारत पेट्रोलियम, सीजीएसटी मुंबई बंदर, डीपीयु पुणे, मिड लाईन, मध्य रेल्वे, एच. ए. एल नाशिक, मीरा-भाईंदर पालिका, युनियन बँक, ठाणे पालिका यांनी ओम ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेची बाद फेरी गाठली. वरळीच्या आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील मॅटवर झालेल्या 'फ' गटातील साखळी सामन्यात रायगडच्या मिडलाईन अकादमीने बलाढ्य अशा मध्य रेल्वे संघावर ४९-२० अशी सहज मात केली. झंझावाती सुरुवात करणाऱ्या मिड लाईनने पूर्वार्धातच ३ लोण देत ३५-१२ अशी मोठी आघाडी घेतली.

महावितरण

## ई - निविदा सूचना

महावितरण तर्फे अधीक्षक अभियंता (स्था), स्थापत्य मंडळ, कल्याण यांच्या कडुन अनुभवी व पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | निविदा रक्कम (रु) | बयाणा रक्कम(रु) |
|---|---|---|---|---|
| १. | कल्याण (ग्रामीण') विभाग, कल्याण मंडळ २ च्या अखत्यारीत, मांडा टिटवाळा, तालुका-कल्याण, जिल्हा ठाणे येथील सीएसडी उपविभागाच्या आवारात कंपाऊंड भिंतीचे अंशतः बांधकाम, स्टोअर शेड आणि पार्किंग शेडचे बांधकाम करणे. | एसईसी/कल्याण/ता/ टि-०१/ २०२६-२०२७ | २२६१६०२/- | २२६५०/- |
| २. | महावितरण पंचक नाशिक, ता. जि. नाशिक येथील फिल्टर युनिट अर्बन ॥ विभागा अंतर्गत लोडिंग आणि अनलोडिंग प्लॅटफॉर्मचे व कॉंक्रीट रस्ता बांधकाम व निगडित स्थापत्य कामे करणे. | एसईसी/कल्याण/ता/ टि-०२/ २०२६-२०२७ | ३६३९५९८/- | ३६४००/- |
| ३. | महावितरण प्रशासकीय इमारत, ओपीएच परिसर, येथील मंडळ कार्यालय ,अहिल्यानगर तळमजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर स्थलांतरित करण्यासाठीची स्थापत्य कामे करणे. | एसईसी/कल्याण/ता/ टि-०३/ २०२६-२०२७ | ४५४९१८४/- | ४५५००/- |

निविदेचा विक्री कालावधी **दि. १७.०४.२०२६ ते ०१.०५.२०२६ रोजी १३:००** वाजेपर्यंत आहे. तसेच ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने सर्व तपशीलासह सादर करण्याची वेळ **दि. ०१.०५.२०२६ रोजी १५.००** वाजेपर्यंत आहे. निविदेबाबतची शुध्दीपत्रके जसे की काही मुदतवाढ, पुन:निविदा ही फ़क्त कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याची निविदाकारांनी नोंद घ्यावी. निम्न स्वाक्षरी कार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.
संपर्क अधिकारी कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य मंडळ, कल्याण. भ्रमणध्वनी- ८८७९६२०८६० व संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in/eatApp

**अधीक्षक अभियंता (स्था), स्थापत्य मंडळ कल्याण.**

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, **जिल्हा व तुकडी पालघर, पोट तुकडी व तालुका वसई, मौजे सांडोर** येथील (अकृषिक) स. नं. २७-ब, क्षेत्र १७-४५-०० (आर. चौ. मि), आकार ३३-७५ व त्यावर असलेली **"अंतोन घरशी चाळ", तळमजला+ १ मजला,** तसेच त्यावर असलेल्या इतर चाळी व घरे, व. वि. श. म. च्या हद्दी पैकी (ज्यास ह्या पुढे संक्षिप्ततेसाठी **"सदर मिळकत"** म्हणून संबोधण्यात यावे) ही मिळकत आमचे अशिल १) प्रेसिला असिस फरेरा, २) रुपाली संतोष वळवईकर, ३) मिल्ड्रेड लेस्ली घोन्सालविस, ४) ॲना क्रिस ग्रेशस ५) ऑल्विन क्रिस ग्रेशस ६) ऑस्कर क्रिस ग्रेशस ७) अलॉयशियस क्रिस ग्रेशस, ८) ईलेन नॉर्बट ब्रिटो, ९) ॲन्सिला मेल्विन डिसिल्वा १०) युजीन पॉल डायस ११) आयरीन एलिस ग्रेशस १२) केरोलीन एलिस ग्रेशस १३) ॲसल्टीना रुफिन रिबेलो १४) केझील एलिस ग्रेशस १५) बिना जोसेफ घोन्सालविस १६) अर्मिला थॉमस रिबेलो १७) नॉर्मा शैलेश डिसिल्वा १८) जोसेफ गब्रेल डिमेलो १९) फेलिशियाना रेमंड मच्याडो २०) हेलन बरतोल अन्द्रानडीस २१) हेरॉल्ड बर्नाबास मच्याडो २२) शानल बर्नाबास मच्याडो २३) बेरील आल्बर्ट ग्रेशस, २४) शुबर्ट आल्बर्ट ग्रेशस सर्व रा. होळी बाजार, वसई, ता. वसई, जि. पालघर- ४०१२०१ व अन्य सह-हिस्सेदार श्री. केवीन दुमिंग उर्फ डॉमणिक घरशी उर्फ ग्रेशिअस यांच्या सामाईक मालकीची असून ती मिळकत रेकॉर्ड कागदोपत्री आमचे अशीलांचे व सामाईक हिस्सेदार यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची आहे. आमच्या अशिलांची नावे ७/१२ उताऱ्या सदरी दाखल आहेत. सदर मिळकतीवर असलेल्या चाळी या जीर्ण झाल्या असल्याने त्या सी-१ प्रवर्गात मोडत असल्याने त्याबाबत वसई विरार शहर महानगर पालिका, प्रभाग समिती "आय" तर्फे सूचना घर मालकांना दिलेली आहे व त्या चाळी अति धोकादायक चाळी म्हणून घोषित करण्यता आलेल्या आहेत. सदर मिळकती या आमच्या अशिलांच्या सामायिक मालकीच्या असल्याने कुणीही इसम, संस्था, विकासक, कंपनी, यांनी आमच्या अशिलांच्या संमत्ती अथवा परवानगी शिवाय कुणा बरोबर अथवा कुणाशीही, कुठल्याही प्रकारचा व्यवहार करू नये त्यास आमच्या अशिलांची सक्त हरकत आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणीही आक्षेपार्ह व्यवहार केल्यास आमचे अशिल संबंधित इसम, संस्था, विकासक, कंपनी, विरुद्ध कायदेशीर कारवाई करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कळावे, आपला विश्वासू
**सही/-**
**वकील डी.एन.वळवईकर**
कार्यालयीन पत्ता:-ए/१, तळमजला, स्नेहलपार्क, को. ऑ. हौ. सो. वसई न्यायालयाजवळ, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, ४०१२०१
ठिकाण- वसई दिनांक : १७/०४/२०२६

# शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांची ३ मेपासून ८१ दिवसांची गाविष्ठी यात्रा

■ लखनौ

**गायीला** राष्ट्रमातेचा दर्जा मिळवून देण्यासाठी व सनातन धर्माच्या रक्षणासाठी ज्योतिर्पिठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी ८१ दिवसांच्या गाविष्ठी (गोरक्षार्थ धर्मयुद्ध) यात्रेचा संकल्प सोडला आहे. येत्या ३ मे रोजी या यात्रेचा शुभारंभ होणार आहे. ३ मे रोजी ज्येष्ठ कृष्ण द्वितीयेला सुरू होणारी ही यात्रा २४ जुलैपर्यंत सुरू राहणार आहे. या काळात ही यात्रा उत्तर प्रदेशच्या सर्व ४०३ विधानसभा मतदारसंघांतून मार्गक्रमण करणार आहे. गायींचे संरक्षण व गायींच्या कल्याणासाठी ठोस उपाय योजणे हे या यात्रेचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. गायीला राज्यमाता, राष्ट्रमातेचा दर्जा मिळवून देणे, राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये गायींसाठी निवारा उभारणे (ग्रोधाम), मतदार संघातील प्रत्येक हिंदूला 'गोमतदाता होण्यासाठी प्रेरित करणे, प्रत्येक खेड्यात व आसपासच्या परिसरात ५ गोविरांची नेमणूक करणे व मतदारसंघनिहाय कत्तलखाने आणि गोशाळांची गणना करून तेथील परिस्थिती जाणून घेणे, या ५ प्रमुख मुद्यांवर या यात्रेत भर दिला जाणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# जमीन गैरव्यवहार प्रकरणी रॉबर्ट वाड्रा यांना समन्स

■ नवी दिल्ली

**हरियाणातील** गुरुग्राममधील शिकोहपूर येथील जमीन गैरव्यवहार आणि मनी लाँड्रिंग प्रकरणी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांना समन्स बजावले आहेत. ईडीच्या आरोपपत्राची दखल घेत न्यायालयाने वाड्रा आणि अन्य आरोपींना १६ मे रोजी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. विशेष न्यायाधीश सुशांत चांगोत्रा यांच्या न्यायालयाने गेल्यावर्षी जुलैमध्ये ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेतल्यानंतर हे समन्स जारी करण्यात आले.

देश विदेश

# तुर्कीमध्ये सलग दुसऱ्या दिवशी शाळेत गोळीबार! चार जण ठार

■ अंकारा

**तुर्कीमध्ये** शाळेत झालेल्या गोळीबारात १६ जण जखमी झाल्यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी आज आणखी एका शाळेत गोळीबाराची घटना घडली आहे. ही घटना कहरामानमाराश येथील आयसर चालिक सेकंडरी स्कूलमध्ये घडली. या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला असून त्यात तीन विद्यार्थी आणि एका शिक्षकाचा समावेश आहे, तर सुमारे २० जण जखमी झाले आहेत. हल्लेखोर हा त्याच शाळेतील आठवीतील विद्यार्थी होता. त्या विद्यार्थ्याने त्याच्या वडिलांची बंदूक बॅगमध्ये लपवून आणली होती. त्याचाही घटनेत मृत्यू झाला. या घटनेची प्राथमिक माहिती आल्यानंतर आपत्कालीन वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी पाठवण्यात आल्या.

# जर्मनी व युक्रेनमध्ये संरक्षण सहकार्य करार

■ बर्लिन

**जर्मनी** आणि युक्रेनने संरक्षण सहकार्य करार करण्याचे निश्चित केले. अत्याधुनिक ड्रोन आणि इतर युद्धसिद्ध संरक्षण प्रणालींच्या संयुक्त उत्पादनाच्या योजनांवर दोन्ही देशांनी एकत्रितपणे काम सुरू करणार आहे.

विविध प्रकारची ड्रोन, क्षेपणास्त्रे, सॉफ्टवेअर आणि आधुनिक संरक्षण प्रणाली एकत्रितपणे विकसित करण्यासाठी युक्रेनने जर्मनीला प्रस्ताव दिला होता. आता त्याविषयी दोन्ही देशांचे चमू काम करतील, असे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी बर्लिन दौऱ्यात चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांच्यासोबत आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले. रशियाविरुद्ध युक्रेनला मदत करण्यास जर्मनी कटिबद्ध असून हा रशियाला एक स्पष्ट संकेत असल्याचेही मर्झ यांनी सांगितले. या संरक्षण करारानुसार युरोपिय संघाकडून युक्रेनला १०६ अब्ज डॉलरचे कर्ज मिळू शकणार आहे.

# लोकलमधून पडून मृत्यू झालेल्या तरुणाच्या आईला ४ लाखांची भरपाई

■ मुंबई

**१६ वर्षांपूर्वी** लोकलमधून पडून अपघाती मृत्यू झालेल्या तरुणाच्या आईला गुरुवारी उच्च न्यायालयाने न्याय दिला. तरुणाचा अपघाती मृत्यू 'दुर्दैवी घटना' असल्याचे निरिक्षण न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी नोंदवले. त्याच आधारे न्यायालयाने विक्रोळीतील तरुणाच्या आईला ४ लाख रुपयांची भरपाई मंजूर केली. रेल्वे प्रशासनाने भरपाईची रक्कम दोन महिन्यांत याचिकाकर्त्या आईच्या बँक खात्यात जमा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या निर्णयाने मध्य रेल्वेला मोठा दणका दिला.

२४ सप्टेंबर २०१० रोजी श्रीनिवास कोमुरावेली हा तरुण डॉकयार्ड रोड ते विक्रोळी असा प्रवास करीत होता. शिवडी रेल्वे स्थानकाजवळ तरुणाचा अपघाताने मृत्यू झाला. रेल्वे दावा न्यायाधिकरणाने तरुण रुळ ओलांडत होता. त्यादरम्यान त्याचा मृत्यू



झाला असावा, असा संशय व्यक्त करत नुकसान भरपाईचा दावा फेटाळला होता. न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरोधात मृत तरुणाच्या पालकांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. याप्रकरणी न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकलपीठाने सुनावणी घेतली आणि महत्त्वपूर्ण निर्णय दिला. मृत तरुणाकडे विक्रोळी ते डॉकयार्ड रोड प्रवासाचे वैध तिकीट सापडले होते. त्यामुळे तो वैध प्रवासी होता हे सिद्ध होते. तरुण रुळ ओलांडत असताना अपघात झाला, हे सिद्ध करण्यासाठी रेल्वेने कोणत्याही प्रत्यक्षदर्शीची किंवा मोटरमनची साक्ष नोंदवली नाही, असे नमूद करीत न्यायालयाने मृत तरुणाच्या आईला ४ लाखांची भरपाई मंजूर केली. प्रकरण प्रलंबित असताना मृत तरुणाच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे न्यायालयाने आता केवळ आईला ४ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले.

# नवी मुंबई विमानतळावर तिसरी धावपट्टी! सल्लागार नियुक्त

■ नवी मुंबई

**सिडकोकडून** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे तिसऱ्या धावपट्टीच्या विकासासाठी तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यास हाती घेण्यात आला आहे. या अभ्यासासाठी राईटस् लिमिटेड आणि क्रिएटिव्ह ग्रुप एलएलपी यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हा अभ्यास पुढील सहा महिन्यांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. १५ एप्रिल रोजी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे मुंबई महानगर प्रदेशासाठी दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ असून, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ यांच्यासह दुहेरी विमानतळ प्रणालीचा भाग म्हणून कार्यरत आहे. प्रस्तावित अभ्यासामध्ये तिसऱ्या धावपट्टीची तांत्रिक, कार्यकारी, पर्यावरणीय आणि आर्थिक व्यवहार्यता सर्वंकषपणे तपासली जाणार आहे. यामुळे प्रदेशातील विमानवाहतूक पायाभूत सुविधा अधिक सक्षम होऊन दीर्घकालीन क्षमतेत वाढ होण्यास मदत होईल, असे सिडकोकडून सांगण्यात आले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा मुंबई महानगर प्रदेशच्या भविष्यातील गरजांसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. वाढत्या हवाई वाहतुकीचा विचार करता भविष्योन्मुख नियोजन आवश्यक असून, तिसरी धावपट्टी या दृष्टीने महत्त्वाची ठरेल.

# स्वयंचलित दरवाजाची लोकल आली प्रवाशांचा जीव घुसमटण्याची भीती

■ मुंबई

**मुंबईच्या** उपनगरीय रेल्वेत प्रथमच स्वयंचलित दरवाजे असलेल्या नॉन-एसी लोकलचे आगमन झाले आहे. चेन्नईच्या इंटिग्रल कोच फॅक्टरीमधून १२ डब्यांची ही ट्रेन नुकतीच कुर्ला कारशेडमध्ये दाखल झाली. आता मध्य रेल्वेकडून या गाडीची हाय-स्पीड आणि वजन वाहून नेण्याची क्षमता चाचणीला लवकरच सुरुवात होणार आहे. मात्र लोकलमधील प्रचंड गर्दी आणि स्वयंचलित बंद दरवाज्यामुळे प्रवाशांचा जीव घुसमटण्याची भीती व्यक्त होत आहे. सर्व चाचण्या यशस्वी झाल्यानंतर, प्रवाशांसाठी ही ट्रेन बहुधा कमी गर्दीच्या नेरुळ-उरण मार्गावर चालवली जाण्याची शक्यता आहे.

लोकलमधून पडण्याच्या वाढत्या दुर्घटना आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव स्वयंचलित दरवाजांचा हा निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या नॉन-एसी लोकलच्या तुलनेत या नवीन ट्रेनच्या रचनेत आणि क्षमतेत मोठे बदल करण्यात आले आहेत. या गाडीत बसण्याची क्षमता १,०२८ वरून १,००३ वर आणली आहे. मात्र उभ्याने प्रवास करण्यासाठी अधिक जागा उपलब्ध करून दिल्यामुळे ही ट्रेन ३,६०० ऐवजी सुमारे ५,६०० प्रवाशांना नेऊ शकते. या ट्रेनमध्ये प्रथम श्रेणीचे तीन ऐवजी चार डबे देण्यात आले आहेत.

## प्रवेश सुरु...प्रवेश सुरु...प्रवेश सुरु

### लेट. एन. बी. छाबडा मिलिटरी स्कूल, रायगांव, सातारा.

मिलिटरी स्कूल (को.एज्यु.) सातारा येथे सन २०२६-२७ साठी इयत्ता ५ वी ते १२ वी (इंग्रजी माध्यम) प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

शासन नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण अनुदानाची सोय आहे.

ॲडमिशनसाठी घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा ही रविवार दि. २६/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता ५ वी ते १२ वी साठी इंग्रजी, गणित व सामान्यज्ञान या विषयांचा प्रवेश परीक्षेमध्ये समावेश असेल. सदर परीक्षेचे नावनोंदणी शुल्क रु. ५००/- भरुन खाली दिलेल्या अकाउंट नंबर वर दि. २३/०४/२०२६ पूर्वी नावनोंदणी करणे बंधनकारक असेल.

**Account Details**
**Name of Bank :** Union Bank Of India Branch Satara
**A/c Name :** N.B.Chhabada Military School
**Saving A/C No. :** 579302010004089
**Amount to be deposited :**
**Code IFSC : UBINO557935**

: संपर्क :
मोबा.: 9881373735, 9822027728

: पत्ता :
सर्व्हे नं. २५९, मु.पो.रायगांव,
ता.जावळी, जि.सातारा. ४१५०२०

## SBI-SG

*One Stop Solution For All Investments*

**SBI-SG GLOBAL SECURITIES SERVICES PVT. LTD.**
B-Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) Building,
SVP Road, Santacruz (W), Mumbai – 400054, Maharashtra, India

### TENDER NOTICE

Chief Financial Officer, SBI-SG Global Securities Services Pvt Ltd, B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India invites sealed bids from authorized OEMs (Lenovo, HP, Dell) or through their authorized distributors/partners for supply , Installation and Support of 100 Laptops with comprehensive 3 years warranty and accidental insurance as per requirement mentioned in RFP number: **RFP/IT/26-27/011**. The complete set of bidding documents can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in/statutory/ "TENDER"** section. Complete set of bidding documents may be submitted in sealed envelopes on or before 29-04-2026 by 11:30 pm at our registered office.

Sd/-
(Amitav Kar)
Chief Financial Officer

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आमच्या अशिलांनी याखालील अनुसूचीमध्ये पहिली आणि दुसरी अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली गाव झिराड, तालुका अलिबाग येथे स्थित अ-कृषिक मालमत्ता विद्यमान मालक श्री. मोहिना भुपिंदरसिंग मक्कार, राहणार मुंबई यांच्याकडून संपादित करण्याचे मान्य केले आहे.

स्वतंत्र व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपनी (कंपन्या), बँक(का), वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म(स), व्यक्तींची संघटना किंवा स्वतंत्र व्यक्तींचे स्थापित असलेले किंवा नसलेले मंडळ, सावकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेले परंतु त्यास मर्यादित नसलेल्या कोणा व्यक्ती/क्तींचा/एन्टिटी/एन्टीटींचा याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्ता आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भाग/तुकड्याच्या संदर्भात वारसा, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाणवट, तारण, प्रभार, वाटप, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, अभिहस्तांकन, भाडेकरू, भेट, हक्कसोड, देवाणघेवाण, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड/विभागणी, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देखभाल, वहिवाट, न्यास, ताबा, कुटुंब, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारपत्रे, भागिदारी, मार्गाचा अधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, संपादन, कंत्राट/करारपत्र, सामंजस्य करार, विक्रीचा करार, मुखत्यार पत्र, पर्याय, वाटप, प्रथम नकाराचा अधिकार, पूर्व हस्तांतरण किंवा कोणतेही दायित्व किंवा कोणतीही वचनबद्धता या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही लाभ, शीर्षक, दावे, आक्षेप, मागण्या किंवा हक्क किंवा कशाही प्रकारे हितसंबंध असल्यास, त्यांनी त्याबाबत सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत निम्न उल्लेखित पत्त्यावर लेखी कळवावे, असे न केल्यास अशा व्यक्ती/एन्टिटी(टीं)चे हक्क, शीर्षक, दावे, आक्षेप, लाभ, अधिकार, मागण्या आणि/किंवा हितसंबंध जाणूनबुजून आणि स्वेच्छेने सोडून दिले किंवा त्याग करण्यात आले.

**वरील उल्लेखित मालमत्तेची अनुसूचीः**

**पहिली**

महसूल गाव झिराड, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या भूमापन क्र. उपविभाग क्र. १६९/१, (जुना गट क्र. १७०, हिस्सा क्र. १) धारण केलेल्या, एकूण क्षेत्रफळ मोजमाप ०-८३-२० (एच.ए.), मुल्यांकित रु. २१-६० पै. जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे.

**दुसरी**

महसूल गाव झिराड, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या भूमापन क्र. उपविभाग क्र. १६९/२, (जुना गट क्र. १७०, हिस्सा क्र. २) धारण केलेल्या, क्षेत्रफळ मोजमाप ०-५५-१० (एच.ए.), पोट खराबा ०-१०-७० (एच.ए.), एकूण क्षेत्रफळ मोजमाप ०-६५-८० (एच.ए.), मुल्यांकित रु. १-०० पै. जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे.

दिनांक १७ एप्रिल, २०२६

सही/-
**बिलावाला ॲण्ड कं.**
**खरेदीदारांकरिता ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स**
**करीम चेंबर्स, २ रा मजला, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.**

रामेश्वर मीडिया

## ज्याच्याशी संबंधित आहे त्यांच्याकरिता

**याची नोंद घ्यावी की** माझे अशिल **सुश्री मधुरा सुधीर घाडशे** यांनी मला कळविले आहे की **दिनांक २२.०८.१९९७ रोजी** करण्यात आलेला **मूळ करारनामा,** जो मे. जिवलापाडा को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. (प्रस्तावित) ज्यात पहिला पक्ष म्हणून उल्लेख आहे आणि श्री. सुधीर अर्जुन घाडशे, ज्यात दुसरा पक्ष म्हणून उल्लेख आहे यांच्यामध्ये **फ्लॅट क्र.२०३, विंग 'सी', समर्थ एसआरए कोहौसोलि, जिवलापाडा, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई – ४००१०१ (प्रिमायसेस)** संदर्भात करण्यात आला होता, तो हरवला/गहाळ झालेला आहे व प्रामाणिक शोध व प्रयत्न करूनही सदर कागदपत्र सापडले नाही. सदर कागदपत्र हरवल्याबाबतची माहिती समता नगर पोलीस स्टेशन, मुंबई येथे हरवलेला अहवाल क्र. २७८३/२०१६, दिनांक ०९.०८.२०१६ अन्वये नोंदविण्यात आलेली आहे.

**पुढे लक्षात घ्या की, कोणतीही व्यक्ती, संस्था** (आर्थिक किंवा अन्यथा) ज्यांचा **सदर प्रिमायसेस** संदर्भात वारसा, हिस्सा, विक्री, गहाणखत, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, भेटवस्तू, ताबा किंवा अधिभार यासारख्या कोणत्याही प्रकारे कोणताही दावा किंवा अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रकाशित झाल्यापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्याचे/तिचे/त्यांचे असे दावे, जर असतील तर, **सर्व सहाय्यक कागदपत्रांसह,** अधोस्वाक्षरीकर्त्याला कळवणे आवश्यक आहे, अन्यथा अशा दाव्याचा संदर्भ न घेता व्यवहार पूर्ण केला जाईल आणि अशा व्यक्तीचे दावे, जर असतील तर, माफ केले जातील आणि ते कोणत्याही प्रकारे बंधनकारक नसतील असे मानले जातील.

**अनिल डी. पांडे - वकील**
कामधेनू असोसिएट्स - वकील आणि कायदेशीर सल्लागार
फ्लॅट क्र. सी-१०३, १ला मजला, गोकुळ होरायझन,
गुंदेचा ट्रिलियम समोर, ठाकूर गाव, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१.

## मुरबाड नगरपंचायत, मुरबाड

मु.पो.ता. मुरबाड, जि. ठाणे -४२१४०१. फोन नं. ०२५२४-२२५९०५
ईमेल- mnpmurbad@gmail.com

जा.क्र. मुनप/बांधकाम विभाग/ई निविदा/४४२/२०२६ — दि.०८/०४/२०२६

### ई- निविदा सुचना क्र. ०५ सन २०२६-२७

मुरबाड नगरपंचायत, मुरबाड ता.मुरबाड, जि. ठाणे. बांधकाम विभागाच्या 'महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान' (जिल्हास्तर) या योजनेंतर्गत सन २०२५-२६ या योजनेंतर्गत ०१ कामांची ई - निविदा नगरपंचायत मुरबाडकडून मागविण्यात येत आहे. कामासंबंधी सविस्तर तपशील mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदर निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
मुख्याधिकारी
नगरपंचायत, मुरबाड.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील लोकमान्य - सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत "हजेरी शेड विकसित करणे" या लेखाशिर्षका अंतर्गत प्र.क्र. ०६ मधील लोकमान्यनगर पाडा नं. ४ येथील रेल्वे कॉलनी जवळील परिसरात हजेरी शेड बांधणे या कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. ज्या निविदाकारांवर काळ्या यादीत टाकण्याची अथवा नोंदणी रद्द करण्याची कोणतीही कार्यवाही करण्यांत आले आहे. तसेच प्रस्तावित अथवा सुरु आहे अशा निविदाकारांना या निविदेच्या स्पर्धेमध्ये भाग घेणेस प्रतिबंध करण्यांत येत आहे. निविदा स्पर्धेसाठीच्या पात्रतेच्या अटी निविदा प्रपत्रामध्ये देण्यांत आलेल्या आहेत. सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. १७.०४.२०२६ ते दि. २४.०४.२०२६ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.२४.०४.२०२६ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यांत येतील. सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा शक्य झाल्यास दि.२७.०४.२०२६ सायं. १६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-लो.सा प्र.स/४४/२०२६-२७ सही/-
दि:१६.०४.२०२६ — कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site — ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. :- का. अ. (पूर्व) / मुं. झो.सु.मंडळ/ ई-निविदा/०२/२६-२७**

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण **०५** कामाकरीता बी - १ (टक्केवारी) नमुन्यातील ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई- निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ **http://mahatenders.gov.in,** वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक १७.०४.२०२६ सकाळी १०.०५ पासून दिनांक २४.०४.२०२६ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक/ बदल असल्यास फक्त **http://mahatenders.gov.in**, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

CPRO/A/305

सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

## महावितरण — ई-निविदा सूचना

महावितरण कंपनीच्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून रत्नागिरी मंडल कार्यालयांतर्गत रत्नागिरी, चिपळूण आणि खेड विभागामधील ३३/११ केव्ही उपकेंद्रांच्या प्रतिबंधात्मक (Preventive) देखभाल दुरूस्ती करिता निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | विभाग | निविदा रक्कम (रू. लाखात) | बयाणा रक्कम (रू.) | निविदा खरेदी फी (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | SE/RC/Tech/PM-Substation/T-06/ 2026-27 | रत्नागिरी/चिपळूण/खेड | १०.०० | १०००० /- | ५०००+१८% GST=५९००/- |

निविदा खरेदी फी ऑनलाईन भरणे आवश्यक आहे व बयाणा रक्कम बँक गॅरंटी, डीडी स्वरूपात (पेअेबल ॲट रत्नागिरी) अथवा ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. निविदा दिनांक १६.०४.२०२६ पासून कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख : २२.०४.२०२६ up to २३.५५ Hrs.
तांत्रिक बोली उघडण्याची तारीख : २३.०४.२०२६ at ११.०० Hrs. (if possible)
प्री बिड मिटींग : १७.०४.२०२६ at १२.०० Hrs.

PRO/KZR/No.०६/२०२६-२७ दि. १५.०४.२०२६ — अधीक्षक अभियंता (रमं), मंडल कार्यालय, रत्नागिरी.

## अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जा.क्र. अंनप/आरोग्यविभाग / २०२६-२७/२४ — दि.१६/०४ /२०२६

### ई- निविदा सूचना क्र. ४ सन २०२६-२७

**कामाचे नांव :- सन २०२६-२७ करिता अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचेवर Animal Birth Control Rule २०२३ नुसार निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देणे तसेच जखमी व पिसाळलेल्या श्वानांवर जागेवर जाऊन किंवा केंद्रात आणुन योग्य उपचार करणे.**

या द्वारे, सन २०२६ - २७ करिता अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचेवर Animal Birth Control Rule २०२३ नुसार निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देणे तसेच जखमी व पिसाळलेल्या श्वानांवर जागेवर जाऊन किंवा केंद्रात आणुन योग्य उपचार करणे या कामाकरीता नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडुन ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा दर मागविण्यात येत आहेत.

सदर निविदेकरीता भरावयाचा निविदा फॉर्म व निविदेच्या अटी, शर्ती याबाबतची विस्तृत माहिती शासनाचे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून इच्छुक निविदाधारकाने सदर निविदा फॉर्म दि. १७/०४/२०२६ ते दि. २४/०४/२०२६ दु. ३.०० वाजेपर्यंत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरून, निविदेच्या पात्रतेकरीता आवश्यक कागदपत्रांसह अपलोड करणेचा आहे.

सही/-
(उमाकांत गायकवाड)
मुख्याधिकारी,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

### ई निविदा रद्द करणेबाबत सूचना

**ई-निविदा सूचना क्रमांक ८९/२०२५-२०२६ (मुंबई)**

दिनांक २७/०३/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक हिंदुस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक सागर, ठाणे वृत्तपत्रामध्ये व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर वरील ई-निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती.

वरील वृत्तपत्रांमध्ये व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या ई निविदा सूचनेमधील खालील कामांच्या ई-निविदा रद्द करण्यात येत आहेत. इच्छुकांनी याबाबत नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | टीटीसी औद्योगिक क्षेत्र... नवी मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी (गट- १) विकासकाच्या नियुक्तीकरिता विनंती प्रस्ताव मागविणेबाबत (आरएफपी) | -- |
| २ | टीटीसी औद्योगिक क्षेत्र... नवी मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी (गट-२) विकासकाच्या नियुक्तीकरिता विनंती प्रस्ताव मागविणेबाबत (आरएफपी) | -- |
| ३ | टीटीसी औद्योगिक क्षेत्र... नवी मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी (गट-३) विकासकाच्या नियुक्तीकरिता विनंती प्रस्ताव मागविणेबाबत (आरएफपी) | -- |

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

उद्यान विभाग
फेरनिविदा सुचना

ठामपा/पिआरओ/उद्यान/१३४३ दि.२४/०३/२०२६ नुसार ठाणे महानगर पालिकेच्या उद्यान विभागामार्फत ठामपा हद्दीतील अस्तित्वातील उद्याने, रस्ता दुभाजके व हरित पट्टे यांची निगा देखभाल करणे कामासाठी खालील विषयान्वये ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचे / कामाचे नाव |
|---|---|
| १) | लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत प्र. क्र.१३ अंतर्गत अस्तित्वातील उद्याने व रस्तादुभाजकांची दैनंदिन निगा व देखभाल करणेबाबत. |
| २) | वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्र. क्र. १६ अंतर्गत अस्तित्वातील उद्यानाची व रस्तादुभाजकांची दैनंदिन निगा व देखभाल करणेबाबत. |

वरील एकुण दोन कामांची निविदा सुचना आणि प्रपत्र दि.१७/०४/२०२६ ते दि.२४/०४/२०२६ या कालावधीत ठाणे महानगर पालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in येथे दुपारी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असुन सदर निविदा ई-टेंडरिंग पद्धतीने दि.२४/०४/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या क्र. जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ दि.१९/०८/२०१७ नंतर लागु झालेल्या जीएसटीच्या कराचा विचार करुनच निविदाकारांनी निविदा सादर करावी. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.२७/०४/२०२६ रोजी ११.०० वाजता अथवा पुढील सुचना देऊन निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/उ.वि/४०/२०२६-२७ — सही/-
दि.१६.०४.२०२६ — उद्यान अधिक्षक / वृक्षअधिकारी
Pls visit our official web-site — ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## राशा आणि वीरची नवी जोडी पडद्यावर

बॉलिवूडमधील दोन प्रभावशाली कुटुंबातील मुले आता एकाच चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांचा मुलगा वीर हिरानी आणि अभिनेत्री रवीना टंडनची मुलगी राशा थडाणी यांची जोडी 'लगन लागी रे' या चित्रपटात



मुख्य भूमिकेत असेल. या चित्रपटाचे चित्रीकरण जुलै २०२६ मध्ये सुरू होणार असल्याचे वृत्त समोर आले आहे. हा चित्रपट एका लहान शहरातील समकालीन प्रेमकथेवर आधारित आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सोनाली रतन देशमुख करणार आहेत. त्यांनी यापूर्वी 'जन्नत', 'तुम मिले' आणि 'शिद्दत' यांसारख्या प्रसिद्ध संगीतप्रधान चित्रपटांसाठी कुणाल देशमुख यांना सहाय्य केले आहे. 'स्कॅम १९९२', 'स्कॅम २००३', 'स्कूप' आणि 'रेड २' यांसारख्या गाजलेल्या कलाकृतींचे लेखन करणारे करण व्यास यांनी या चित्रपटाची पटकथा लिहिली आहे.

वीरने यापूर्वी त्याच्या वडिलांच्या 'प्रीतम पेड्रो' या सायबर क्राईम थ्रिलर मालिकेत काम केले आहे; तर राशा थडाणीने अभिषेक कपूरच्या 'आझाद' या ऐतिहासिक चित्रपटातून पदार्पण केले होते.

## 'एकमेव' रणबीरचा जागतिक गौरव

भारतीय चित्रपटसृष्टीसाठी एक अत्यंत अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. जागतिक स्तरावर प्रभावशाली असलेल्या 'टाईम' मासिकाने २०२६ सालातील जगातील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींची यादी जाहीर केली असून, यामध्ये बॉलिवूडचा सुपरस्टार रणबीर कपूरने आपले स्थान निश्चित केले आहे. विशेष म्हणजे, या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळवणारा तो यावर्षीचा एकमेव भारतीय अभिनेता ठरला आहे.

रणबीर कपूरच्या या यशाचे विशेष महत्त्व म्हणजे, त्याच्यासाठी प्रसिद्ध अभिनेता आयुषमान खुराणाने 'टाईम' मासिकात गौरवपर लेख (बायोग्राफिकल नोट) लिहिला आहे. आयुषमानने रणबीरच्या अभिनयशैलीचे आणि त्याच्या जागतिक प्रभावाचे कौतुक करताना म्हटले आहे की, काही अभिनेते आपला वारसा निर्माण करण्यासाठी धडपडतात, तर काही आपल्या कलेतून स्वतःच एक वारसा बनतात. रणबीर कपूर हा दुसऱ्या श्रेणीतील कलाकार आहे. भारतीय चित्रपटसृष्टीसारख्या



अफाट क्षेत्रात आपण सहसा यशाचे मोजमाप बॉक्स ऑफिसच्या आकड्यांवरून करतो. परंतु रणबीरसारखे कलाकार प्रेक्षकांच्या भावनिक जाणिवा समृद्ध करण्याचे काम करतात.

'टाईम १००' च्या या यादीत रणबीर कपूरसोबतच इतरही काही नामवंत भारतीयांनी आपले स्थान पटकावले आहे. यामध्ये प्रसिद्ध शेफ विकास खन्ना आणि गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांचा समावेश आहे.

विविध क्षेत्रातील या भारतीयांच्या उपस्थितीमुळे जागतिक व्यासपीठावर भारताचा वाढता प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. बॉक्स ऑफिसवरील यशाच्या पलीकडे जाऊन, भारतीय चित्रपटांच्या कथा सांगण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणणारा एक 'सांस्कृतिक दुवा' म्हणून रणबीर कपूरकडे आता जागतिक स्तरावर पाहिले जात आहे.

## आमीर झळकणार नव्या बायोपिकमध्ये


बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्टनिस्ट' आमीर खान याच्या आगामी चित्रपटाबाबत गेल्या काही काळापासून जोरदार चर्चा सुरू होत्या. 'लाल सिंग चड्ढा' आणि 'सितारे जमीन पर' (२०२५) नंतर आमीर एका चांगल्या बायोपिकच्या शोधात होता. सुरुवातीला गुलशन कुमार आणि दादासाहेब फाळके यांच्या बायोपिकबाबत चर्चा झाली होती. परंतु आता आमीरने एका वेगळ्या आणि समकालीन व्यक्तिमत्त्वाची निवड केल्याचे समजते आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आमीर खानने 'भारत पे' या स्टार्टअपचे संस्थापक अशनीर ग्रोव्हर यांच्या जीवनावर आधारित चित्रपटासाठी होकार दिला आहे.



स्टार्टअप विश्वातील अशनीर यांचा प्रवास आणि त्यांचे वादळी व्यक्तिमत्त्व आमीरला भावले असून, या चित्रपटाचे काम सध्या प्री-प्रोडक्शन टप्प्यावर आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि निर्मिती राहुल मोदी करणार असल्याचे समजते. आमीरने आजवर अनेक वैविध्यपूर्ण भूमिका केल्या आहेत. त्यामुळे आता तो अशनीर ग्रोव्हर यांची ही 'नो-नॉन्सेन्स' आणि स्पष्टवक्ती शैली पडद्यावर कशी साकारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'मधुबाला'साठी शर्वरीच्या नावाची जोरदार चर्चा

बॉलिवूडमधील सर्वात महत्त्वाच्या आणि प्रतिक्षित प्रकल्पांपैकी एक असलेल्या दिग्गज अभिनेत्री मधुबाला यांच्या चरित्रपटासाठी (बायोपिक) आता अभिनेत्री शर्वरी वाघ हिचे नाव आघाडीवर असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक महिन्यांपासून या भूमिकेसाठी योग्य चेहऱ्याचा शोध सुरू असताना, शर्वरी आता या शर्यतीत सर्वात पुढे असल्याचे वृत्त आहे.



मधुबाला यांच्यासारख्या सौंदर्यवती आणि प्रतिभावान अभिनेत्रीची भूमिका पडद्यावर साकारणे हे कोणत्याही अभिनेत्रीसाठी मोठे आव्हान आहे. शर्वरीपूर्वी या भूमिकेसाठी सारा अर्जुन, कल्याणी प्रियदर्शन, साई पल्लवी आणि अनीत पड्डा अशा अभिनेत्रींच्या नावांची चर्चा झाली होती. मात्र, आता शर्वरीचे नाव या भूमिकेसाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. अद्याप याबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी, चित्रपट वर्तुळात तिच्या नावाची चर्चा रंगली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन 'डार्लिंग्स' फेम दिग्दर्शिका जसमीत के. रिन करणार आहेत. मधुबाला यांच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू पडद्यावर पुन्हा जिवंत करण्यासाठी शर्वरीची निवड झाल्यास तिच्या कारकिर्दीतील हा मैलाचा दगड ठरेल.

## ओटीटीवरील प्रदर्शनास सलमानचा नकार

गेल्या काही दिवसांपासून मनोरंजन विश्वात आणि राष्ट्रीय स्तरावर सलमान खानच्या 'मातृभूमी' या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. संरक्षण मंत्रालयाच्या सूचनेनुसार या चित्रपटातून 'चीन' या देशाचे नाव वगळण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर, हा चित्रपट चित्रपटगृहांऐवजी थेट ओटीटी (डिजिटल प्लॅटफॉर्म) वर प्रदर्शित होईल, अशा अफवांना उधाण आले होते. मात्र, ताज्या माहितीनुसार या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नसून सलमान खान आपला हा महत्त्वाकांक्षी चित्रपट चित्रपटगृहातच प्रदर्शित करण्यावर ठाम आहे. हा चित्रपट प्रामुख्याने मोठ्या पडद्यासाठीच बनवण्यात आला आहे. त्यामुळे चित्रपटाशी संबंधित तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणी सुटल्यानंतर, दिग्दर्शक अपूर्व लाखिया आणि सलमान



खान हा चित्रपट चित्रपटगृहातच प्रदर्शित करण्यावर ठाम आहेत. अनेकांचा असा गैरसमज आहे की, ओटीटी प्लॅटफॉर्मवर सेन्सॉरशिप नसते. त्यामुळे चित्रपटगृहातील प्रदर्शन टाळून चित्रपट थेट ओटीटीवर प्रदर्शित केल्यास अडचणी येणार नाहीत, असे काहींना वाटते. मात्र, वस्तुस्थिती तशी नाही. थेट ओटीटीवर प्रदर्शित होणाऱ्या प्रत्येक चित्रपटालाही चित्रपटगृहातील चित्रपटांप्रमाणेच प्रमाणीकरण (सर्टिफिकेशन) प्रक्रियेतून जावे लागते. सरकारची परवानगी मिळाल्याशिवाय कोणताही चित्रपट सार्वजनिकरित्या प्रदर्शित करता येत नाही. त्यामुळे सर्व अडथळे पार करून 'मातृभूमी' चित्रपटगृहातच आणण्यासाठी निर्माते पूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करत आहेत.

## कृष्णा, कश्मिरा आणि सुनिता यांची कलहसमाप्ती

मनोरंजन विश्वातील एक चर्चेचा ठरलेला कौटुंबिक कलह अखेर संपला आहे. प्रसिद्ध कॉमेडियन कृष्णा अभिषेक आणि त्याची पत्नी कश्मिरा शाह यांनी त्यांचे काका, ज्येष्ठ अभिनेते गोविंदा आणि काकू सुनिता आहुजा यांच्यासोबतचे अनेक वर्षांचे मतभेद मिटवले आहेत. 'लाफ्टर शेफ्स' या लोकप्रिय विनोदी आणि स्वयंपाक विषयावर आधारित रिॲलिटी शोच्या सेटवर सुनिता आहुजा यांनी अनपेक्षितपणे हजेरी लावल्याने हे कुटुंब पुन्हा एकत्र आले आहे.

चित्रीकरण संपल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना कृष्णाने आपला आनंद व्यक्त केला. तो म्हणाला, मामीचे येणे हे आमच्यासाठी खूप मोठे सरप्राईज होते. आम्हाला दोघांनाही याबद्दल कल्पना नव्हती. ती यायला तयार झाली त्याबद्दल तिचे आभार. गेल्या १०-१२ वर्षांत माध्यमांनी आमच्या वादाबद्दल जे काही मसालेदार वृत्त दिले होते, त्या सर्वांना आज आम्ही तिलांजली दिली




असून सर्व काही संपवून एकत्र आलो आहोत. यावेळी कश्मिरा शाहनेही आपल्या खास शैलीत टीकाकारांना सुनावले की, ज्यांनी आमच्या वादात उगीचच रस घेतला, त्या सर्वांना आता गप्प बसण्याची वेळ आली आहे. गोविंदा-सुनिता आणि कृष्णा-कश्मिरा यांच्यातील हा वाद २०१६ च्या सुमारास सुरू झाला होता. कपिल शर्माच्या शोमध्ये गोविंदा आणि सुनिता पाहुणे म्हणून आले असताना एका विनोदावरून त्यांच्यात खटका उडाला होता. त्यानंतरच्या काळात अनेक जाहीर विधाने आणि प्रतिक्रियांमुळे हा तणाव वाढतच गेला. मात्र, आता या वादावर अधिकृतपणे पडदा पडला असल्याचे दिसत आहे.

## बोकडांचे काळीज मागणारा भोंदूबाबा मुंबईच्या मालाड परिसरात फसवणूक

**बाबाचा व्हिडिओ व्हायरल**

■ मुंबई

**राज्यात** अशोक खरात प्रकरण गाजत असतानाच मुंबई आणि अहिल्यानगर जिल्ह्यात भोंदूबाबांकडून नागरिकांची फसवणूक होत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या घटनांमुळे स्थानिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

मुंबईतील मालाड परिसरात राहणारा एक भोंदूबाबा आठवड्यातील रविवार आणि गुरुवारी माझ्या अंगात देवी येते, असा दावा करत लोकांवर जादूटोणा करून भूतबाधा उतरवतो, असा आरोप आहे. या बाबाचा व्हिडिओ व्हायरल झाला. हा भोंदूबाबा उपचाराच्या नावाखाली दारूची बाटली आणि बोकडाचे काळीज मागायचा. मुलबाळ नसलेल्या जोडप्यांना मदत करण्याचेही तो दावे करत होता. अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर दिंडोशी पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोल्हेवाडी येथील दत्तधाममध्ये एका भोंदू बाबाचे प्रताप उघडकीस आले आहेत. हा व्यक्ती मंत्रोच्चार करून आजार बरे करण्याचा दावा करत असून, स्वतःला गडगे महाराज म्हणवतो. या बाबाभोवती मोठ्या प्रमाणात भक्तांची गर्दी होत असल्याचे दिसून आले आहे. तथाकथित महाराज लोकांकडून ११ हजार, २१ हजार ते ५२ हजार रुपयांपर्यंत रक्कम घेत असल्याचा आरोप आहे. त्याचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या प्रकाराची गंभीर दखल घेत पोलिसांकडे कारवाईची मागणी केली आहे.

## पुण्यात गतिमंद तरुणीवर अत्याचार

■ पुणे

**पुणे** शहरातील पर्वती परिसरात गतिमंद तरुणीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली. या घटनेबाबत पीडित तरुणीच्या वहिनीने पर्वती पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी धीरज लोंढे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पीडित तरुणी मानसिकदृष्ट्या दुर्बल असल्याची माहिती आरोपीला आधीपासूनच होती. त्याने याच अवस्थेचा गैरफायदा घेत अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे शहरात संताप व्यक्त होत असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः मानसिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींच्या संरक्षणासाठी अधिक कडक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## मंजुषा देशपांडेची उच्च न्यायालयात कायमस्वरूपी न्यायमूर्तीपदी नियुक्ती

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांची कायमस्वरूपी न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या बैठकीत हा निर्णय मंजूर करण्यात आला.

न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील माणिकचंद पहाडे लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी संपादन केली. त्यानंतर १३ सप्टेंबर १९९१ रोजी त्यांची महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलमध्ये नोंदणी झाली. नोंदणीनंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ वकील ॲड. प्रभाकरराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वकिलीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात सातत्याने वकिली करत विविध दिवाणी, फौजदारी आणि घटनात्मक प्रकरणे हाताळली. विशेषतः सेवाविषयक प्रकरणांमध्ये त्यांचा मोठा अनुभव आहे. वकील म्हणून कारकिर्दीत त्यांनी जिल्हा परिषद हिंगोली, जिल्हा परिषद नांदेड, संभाजीनगर जिल्हा परिषद व महानगरपालिका, भारत संचार निगम लिमिटेड, एसबीआय लाईफ इन्शुरन्स, तसेच गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ यांसारख्या विविध शासकीय व निमशासकीय संस्थांचे प्रतिनिधित्व केले.

## आता विद्यार्थ्यांच्या नावात वडिलांआधी आईचे नाव

■ नाशिक

**राज्य** सरकारने विद्यार्थ्यांच्या नावात आता वडिलांच्या नावाआधी आईचे नाव लावणे अनिवार्य केले आहे. या निर्णयामुळे केवळ कागदोपत्री बदल होणार नसून समाजात मातृशक्तीचा सन्मान वाढवण्यासाठी हे एक मोठे पाऊल मानले जात आहे.

येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व शाळांमध्ये या नियमाची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे. आतापर्यंत विद्यार्थ्यांचे नाव लिहिताना विद्यार्थ्याचे नाव-वडिलांचे नाव- आडनाव अशी पद्धत होती. मात्र, नव्या निर्णयानुसार आता विद्यार्थ्याचे नाव-

**समाजात मातृशक्तीच्या सन्मानात वाढ**

आईचे नाव-वडिलांचे नाव आणि आडनाव असा क्रम निश्चित करण्यात आला आहे. सर्व शासकीय, अनुदानित आणि खासगी शाळांना हा नियम बंधनकारक असणार आहे. शाळेत प्रवेश घेताना आता केवळ वडिलांच्या नावावर अवलंबून न राहता. आईचे नाव नोंदवणे अनिवार्य झाले आहे.

शाळेचे हजेरीपत्रक, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला आणि प्रवेश निर्गम उतारा या सर्व अधिकृत कागदपत्रांवर आता आईच्या नावाचा उल्लेख अग्रक्रमाने दिसेल. सिंगल पेरेंट किंवा आईकडे राहणाऱ्या पाल्यांच्या बाबतीत येणाऱ्या तांत्रिक अडचणीही या निर्णयामुळे दूर होण्यास मदत होणार आहे.

## चेंबुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वह्या-पेन वाटप उपक्रम

■ मुंबई

**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मैनाबाई सोनबाजी मानकर बहुउद्देशीय विकास संस्था व आसान्या फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चेंबूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात वह्या व पेन वाटपाचा सामाजिक उपक्रम पार पडला.



या उपक्रमाचे आयोजन संस्थेचे संचालक अमोल मानकर यांच्या नेतृत्वाखाली प्रशांत भिसे, संतोष खरात, स्वप्निल खरात, सागर डोळस, गौतम दुपारे व सुजाता भिसे यांच्या सहकार्याने करण्यात आले. यावेळी परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या विचारसरणीने प्रेरित होऊन हा उपक्रम राबविण्यात आला. समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षणाची साधने पोहोचविण्याचा हा एक सकारात्मक प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## डोंबिवलीत भाजी मंडईतील तबबल ११४ गाळे सील केले

■ डोंबिवली

**शहरातील** पूर्वेकडील रेल्वे स्टेशनबाहेर असलेल्या उर्सेकर वाडी परिसरात मधुबन सिनेमागृहासमोर भाजी मंडईत पालिकेच्या पथकाने धडक कारवाई मोहीम राबवली. या कारवाईत तब्बल ११४ भाजीपाला विक्रीचे गाळे सील करण्यात आले.

महापालिकेचे सहाय्यक आयुक्त भरत पवार आणि सहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तसेच मालमत्ता कर विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली.यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या कारवाईची माहिती देताना सहाय्यक आयुक्त भरत पवार म्हणाले की, या मंडईतील काही भाजी विक्रेत्यांनी आपल्या गाळ्याच्या बाहेरील ओट्यावर शटर लावून अनधिकृतपणे दुकान बनविले आहे. अशा ११४ गाळ्यांना सील ठोकण्याची कारवाई केली. आता पुढील कारवाईसाठी संबंधितांच्या करारपत्रांची तपासणी करण्यात येणार असून अनधिकृतता आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. या भाजी मंडईचा वापर मूळ उद्देशापेक्षा वेगळ्या कारणांसाठी होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

## क्रिकेटर विनोद कांबळीची प्रकृती चिंताजनक

■ मुंबई



**क्रिकेट** प्रशिक्षक सर रमाकांत आचरेकर यांचे शिष्य असलेले माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी याची प्रकृती पुन्हा बिघडली असून, त्याला ब्रेन स्ट्रोकचा धोका असल्याची माहिती समोर आली आहे. कांबळी याला या कठीण काळात आर्थिक आणि मानसिक आधार देण्यासाठी अनेक माजी क्रिकेटपटू पुढे सरसावले आहेत.

काही महिन्यांपूर्वी ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात कांबळी याच्यावर उपचार करण्यात आले होते. त्यावेळी त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली होती. पुन्हा त्याच्या प्रकृतीने चिंतेत भर घातली आहे. इतकेच नव्हे तर त्याला स्वतःच्या पायावर उभे

**ब्रेन स्ट्रोकचा धोका**

राहून चालणेही कठीण झाले आहे. विनोद कांबळी याला आवश्यक मदत करण्यासाठी कांबळीच्या मित्रांनी व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून मदतीसाठी लागणारी माहिती सदस्यांना दिली जात आहे. या ग्रुपमध्ये कांबळीचा जवळचा मित्र आणि माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याचाही समावेश असल्याचे सांगितले जात आहे. कांबळीचे मित्र मार्कस कुटो यांनी सांगितले की, विनोदची स्मरणशक्ती पूर्वीसारखी राहिलेली नाही. त्याला भूतकाळातील अनेक गोष्टी आठवणे कठीण जाते.

काही वेळा एखादी गोष्ट अचानक आठवते, पण बहुतेक वेळा आठवण काढणे त्याच्यासाठी आव्हानात्मक ठरते.डॉक्टरांनी मेंदूतील रक्तवाहिन्यांशी संबंधित समस्या उद्भवू शकते, असा इशारा दिला असून ब्रेन स्ट्रोकचा धोका वाढल्याचे सांगितले आहे.

## वारकरी संप्रदायात घुसखोरी शरद पवार गटाकडून यादी जाहीर

**भाजपाच्या तुषार भोसलेंचे नाव**

■ मुंबई

**ज्येष्ठ** नेते शरद पवार यांनी वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी झाल्याचा आरोप केल्यानंतर राज्यातील राजकारण तापले आहे. यानंतर शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी पत्रकार परिषद घेऊन २० कीर्तनकार आणि कथित घुसखोरांची यादी जाहीर केली आहे. यात अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख तुषार भोसले यांचेही नाव आहे.

प्रवक्ते विकास लवांडे म्हणाले की, किशोर व्यास (उर्फ गोविंद देवगिरी), चारुदत्त आफळे, बंडातात्या कराडकर, प्रकाश जवंजाळ, तुषार भोसले, अक्षय भोसले, संग्राम भंडारे, योगी निरंजन, एकनाथ सदगिर, ज्ञानेश्वर जळकीकर, संजय पाचपोर, भास्करगिरी महाराज (देवगड), संजय नाना धोंडगे, राणा वास्कर, चंद्रशेखर देगलूरकर, उद्धोद पैठणकर, शाम राठोड, किशोर शिवनीकरण, निरंजन कोटेकर आणि रामगिरी महाराज यांच्यावर प्रतिगामी विचारांचे आहेत.


पुढे विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदायाबाबतही भाष्य केले. ते म्हणाले की, वारकरी संप्रदाय हा सनातन धर्मापेक्षा वेगळा असून तो समतेचा आणि भेदभावविरोधी विचार मांडणारा आहे. मात्र सध्या या पवित्र परंपरेला कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## गोरेगावच्या बांगुर नगरमध्ये झोपडपट्टीला भीषण आग

■ मुंबई

**गोरेगाव** पश्चिम येथील बांगुर नगर परिसरात आज सकाळी भीषण आग लागली. मेट्रो लाईनजवळ आणि डी-मार्टसमोरील झोपडपट्टीत लागलेल्या या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या चार ते पाच गाड्या घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही. मात्र, आगीत झोपडपट्टीतील चार ते पाच दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली आहेत. त्यामुळे स्थानिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार सजावटीच्या आणि डेकोरेशनच्या साहित्याला आग लागल्याने ती वेगाने पसरली.

# नवाकाळ शब्दकोडे– १५७८



**आडवे शब्द –**

२. मोदक, भाकरी इ.साठी गरम पाण्यात भिजवलेले पीठ ४. भारतीय वर्षगणनेनुसार हे सहा असतात, एरवी तीन ६. दर्पण, ऐना ९. खास ११. लसूणमिरचीचे झणझणीत तोंडीलावणे १२. डागाळलेला, बदनाम १३. पृथ्वीच्या पोटातला तप्त द्राव १५. महिषी १६. फजिती १९. चंद्रपूरचे राष्ट्रीय अभयारण्य २०. अरण्य २२. मगर २३. उरलेले २५. पाषाण २६. वांती २८. प्रशंसा ३०. ब्राह्मण ३२. नाशवंत ३३. व्रत ३५. कफनी, छाटी ३७. महत्त्व ३९. खेद ४१. जास्तीतजास्त ४३. खारकेचे पूर्वरूप ४४. तक्रार, फिर्याद ४५. खुमखुमी ४७. मालदार ४८. ढीग ४९. फुलांचा अलंकार ५०. आठवड्याचा सातवा अंश ५१. दडपण ५२. निद्रा ५४. चमत्कारिक ५५. युद्ध ५७. गायब, उदा. मालाचे बाजारपेठेतून नाहीसे होण ५९. उथळ पाण्याचा आवाज ६१. गर्दी ६३. वीज ६४. नोकर ६५. कविता करणारा ६६. पवित्र ६८. फोडणीचे वरण ६९. उभा ७०. ताकद ७१. आपुलकी ७२. सेनेचा प्रमुख ७५. इच्छा ७६. गुरांचा समूह ७७. नगर ७९. पोहणे ८१. आधीच्या विरूद्ध भूमिका घेणे, पलटी मारणे ८३. प्रिय व्यक्ती भेटणे, संगम ८५. शेवया, रवा, तांदूळ इत्यादीचे दूध घालून केले जाणारे पक्वान्न ८७. प्रथा, राबता ८९. बांध ९०. नेत्रहीन ९२. कंडक्टर ९४. वस्त्राचे ठिगळ बुजवण्याची खुबीदार शिलाई ९६. अचंबित ९८. थोर ९९. सार्वजनिक वाहतुकीचे जड वाहन १००. यशस्वी १०१. मुद्दाम, हेतूत: १०२. पाणी तापवण्याचे विजेवर चालणारे उपकरण १०३. फेरफार, परिवर्तन, पालट

**उभे शब्द –**

१. प्रतिकूल अभिप्राय, टीकेची जोरदार झोड ३. खेळातून, गटातून बाहेर घालवलेला ४. वेदातील रचना ५. दागदागिने ल्यालेली ६. अविचारी ७. दरवर्षीप्रमाणे ८. दुर्दशा १०. गणपतीचा भाऊ ११. कंत्राट १४. वर्ष १७. सूतकताईचे साधन १८. सगळे २१. मिठी २३. ददात २४. तीन चाकी वाहन २७. तुळजाभवानीचे नवरात्रातील रूप २८. पंढरीला विठ्ठल दर्शनाला पायी जाणारा भाविक, भागवतधर्माचा अनुयायी २९. वानर ३१. रस्सी, सुतळी ३४. पहाटेची सुखद नीज ३५. पांडवांना सुईच्या टोकावर मावेल एवढी जमीन देण्यासही नकार देणारे गांधारीपुत्र ३६. नगारखान्यातले मुख्य वाद्य ३८. सक्ती ४०. प्रत्येक, भाव, मूल्य ४२. धांदल ४४अ. अंत, झीज, अवनती ४६. अमृत, मुलींचे एक नाव ४९. सळई ५०. गंध ५३. तोटी ५४. कयास, तर्क ५६. गुप्तता राखून ५८. अस्थिर ५९. सौम्य हशा निर्माण होणे या अर्थाने वापरला जाणारा शब्द- xxxx पिकणे ६०. नाराज ६२. नवरात्रीचा आरंभ ६६. आधुनिक विचारांचा, प्रागतिक ६७. त्यानुसार ७०. मोठेपणा, ऐट ७१. बालंट ७३. घ्राणेंद्रिय ७४. तृतीया ७५. अजून ७८. प्रसिद्धीचे वलय लाभलेला ८०. परिणय, विवाह ८२. भावाची बायको ८४. पुस्ती, परिशिष्ट ८६. पाठवणी, धाडून देणे ८८. शेंगेचे कवच ९१. हिंमत ९३. थडगे ९५. पुष्प, सुमन ९७. भूभाग, प्रदेश १००. सभा, बैठक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७७ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. कोल्हापुरी ४. विकत घेतला श्याम ९. पाप ११. सारथी १२. दमयंती १४. कालवाकालव १७. दुजोरा १८. लाखोली १९. तडा २०. माय २१. सविस्तर २३. नांगर २४. हूल २६. चेतक २८. पर २९. नागीण ३१. बहुत ३३. येथे ३४. रानभरी ३५. उलटा ३६. पाळत ३८. अनेक ३९. तरू ४०. कपाळकरंटा ४३. दाट ४५. धरणे ४७. गचपण ५०. काटेकोरपणे ५५. वासव ५८. फोल ५९. सनसनाटी ६१. लाल ६२. खबर ६३. वरद ६४. कष्टी ६५. वग ६६. लस ६७. पाशवी ६८. सारी ६९. जवान ७२. मैना ७३. साय ७४. वणवा ७६. कुंभकर्ण ७८. साज ८०. यथातथा ८१. तापट ८३. मगज ८४. नरक ८६. कनात ८७. चैन ८८. रोषणाई ९०. संगत ९२. पणजी ९३. क्षेत्र ९४. किंवा ९५. नौदल ९७. होम ९८. सेतू ९९. सुकर १०१. विनाशिका १०२. घुळी १०३. नीरा १०४. दिस १०५. सुतळी

**उभे शब्द** : १. कोण कामास येतो २. पुरावा ३. खरवस ५. कमजोर ६. घेरी ७. लाचखोर ८. मद ९. पायंडा १०. पती ११. साल १३. मतलब १५. लय १६. कालांतराने १७. दुस्तर १८. लागण २२. विपरीत २३. नांगी टाकणे २५. प्रीत २७. कनक २९. नाल ३०. कळक ३२. हुक्की ३६. पाळणा ३७. तरंग ३८. अटकाव ४१. टाच ४२. प्राण ४४. दूर ४६. रक्षा ४८. पवनार ४९. गावाला वळसा ५१. कोलंबस ५२. पठ्ठा ५३. मोलकरीण ५४. मस ५६. सलग ५७. नरवीर तानाजी ६०. नरो वा कुंजरो वा ६२. खलनायक ६३. वश ६७. पायथा ६८. सावट ७०. नभ ७१. पर्ण ७३. सातत्य ७५. वामन ७७. करुणा ७९. जनगणना ८२. पत ८५. रत ८६. कणव ८७. चैत्र ८९. ईश्वर ९१. धुंद ९३. क्षेम ९४. किंतू ९५. नौका ९६. लघु ९७. होरा ९८. सेस ९९. सुत १००. कळी

# २०२३ साली मंजूर महिला आरक्षण विधेयक पुन्हा मांडले

### धर्माच्या नावावर आरक्षण नाही

गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत ठामपणे सांगितले की, भारतात धर्माच्या आधारावर कधीही आरक्षण दिले जाणार नाही.

### विधेयकाबाबत मतदान

आज १३१ वी घटनादुरुस्ती सरकारने नारी शक्ती वंदन सुधारणा विधेयक, मतदारसंघ फेररचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयक ही तीन विधेयके सादर केली. ही विधेयके सादर करण्याच्या विरोधात कितीजण आहेत हे स्पष्ट व्हावे यासाठी विरोधकांनी मतदानाची मागणी केली. इलेक्ट्रॉनिक मतदानात ३३३ खासदारांनी मतदान केले, त्यात २०७ जणांनी विधेयकाला समर्थन दिले तर १२६ जणांनी विरोधात मत दिले. याचबरोबर चिठ्ठीने मतदान झाले. विधेयक सादर करण्यासाठी ३६० मते आवश्यक होती. चिठ्ठी मतदानात समर्थनार्थ २५१ विरोधात १८५ मते पडली. यानंतर विधेयके सादर होऊन चर्चा सुरू झाली. उद्या दुपारी ४ वाजता तिन्ही विधेयकांवर मतदान होणार आहे.

पान १ वरून

याला विरोध केला, तर स्वाभाविकच मला राजकीय फायदा होईल. पण जर आपण सर्व मिळून पुढे गेलो, तर कोणालाही वैयक्तिक फायदा होणार नाही. आम्हाला कोणतेही श्रेय नको आहे. हे विधेयक मंजूर झाल्यावर मी सर्वांचे आभार मानण्यास तयार आहे. तुम्ही ज्या कोणाचा फोटो सांगाल, तो सरकारी खर्चातून छापून देऊ. मी तुम्हाला श्रेय घेण्याचा ब्लँक चेक देतो. जर तुम्हाला 'हमी' हवी असेल तर मी हमी देतो, 'वचन' हवे असेल तर वचन देतो. नियत स्वच्छ असेल तर शब्दांचा खेळ करण्याची गरज नसते.

मतदारसंघ फेररचना बाबत ते म्हणाले की, मी स्पष्ट सांगू इच्छितो की, ही प्रक्रिया कोणावरही अन्याय करणार नाही. कोणत्याही राज्यावर भेदभाव होणार नाही. आधीपासून असलेले प्रमाण तसेच राहील. आपण देशाला तुकड्यांमध्ये वाटू शकत नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आपण एक देश आहोत. त्यामुळे या विषयाकडे जबाबदारीने पाहणे आवश्यक आहे.

**विरोधी पक्षांचा जोरदार विरोध**

काँग्रेसचे वेणुगोपाल यांनी सवाल केला की, महिला आरक्षण विधेयक २०२३ साली मंजूर केले होते तेव्हा ते अंमलात का आणले नाही? समाजवादी पार्टीचे धर्मेंद्र यादव यांनी विरोध करीत म्हटले की, महिला आरक्षणाच्या नावावर आपण घटनेचे उल्लंघन करीत आहात. अखिलेश यादव (समाजवादी पार्टी) यांनीही विधेयकाला विरोध केला. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या डॉ. काकोली घोष म्हणाल्या की, महिलांचे आरक्षण हे जनगणनेवर अवलंबून ठेवता येणार नाही. त्याचवेळी पुरुषांची जागा कमी न करता महिलांना आरक्षण दिले ही समानता नाही. केरळच्या क्रांतीकारी सोशालिस्ट पक्षाचे प्रेमचंदन यांनी विरोध करीत म्हटले की, ही प्रक्रिया महिला आरक्षणासाठी नव्हे तर मतदारसंघ फेररचनेसाठी आहे, महिला आरक्षण हे २०२३ सालीच मंजूर केले आहे. द्रमुक पक्षाचे तामिळनाडूचे टी. आर. बालू म्हणाले की, २०२३ साली महिला आरक्षण मंजूर केले. त्यानंतर २०२४, २०२५ आणि आताही २०२६ साली त्याची अंमलबजावणी केली नाही. आता मतदारसंघ पुनर्रचनेच्या अंतर्गत हे आणून मतदारसंघ फेररचना मंजूर करण्याची ही रणनीती आहे. एमआयएमचे अलाउद्दीन ओवैसी यांनी विरोध करीत म्हटले की, ही विधेयके लोकशाही विरोधी आहेत. हिंदी राज्यांना जास्त ताकद दिली जाणार आहे. ओबीसी, मुस्लीम यांना धक्का लावला जाणार आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राधाकृष्णन म्हणाले की, निवडणुकीच्या काळात ही विधेयके मोडल्याने सरकारच्या उद्देशाबाबत संशय येतो. द्रमुकचे ए. राजा यांनी मुद्दा मांडला की, मूळ विधेयक राष्ट्रपतींनी मंजूर केल्यावरच सुधारणा विधेयके मांडता येतील.

### निशिकांत दुबेंनी आदित्यचे नाव घेतल्याने संताप

पान १ वरून

त्यानंतर अरविंद सावंत म्हणाले की, तुम्हाला बृजभूषण प्रिय आहेत, सेनगर प्रिय आहे. सावंत हे बोलताच भाजपा खासदार निशिकांत दुबे म्हणाले की, तुम्ही यांची नावे घेतली तर एका महिलेला मारणाऱ्या आदित्य ठाकरेचे नाव घ्यायला हवे. निशिकांत दुबे याने हे वाक्य उच्चारताच गदारोळ झाला. अरविंद सावंत आणि सुप्रिया सुळे यांनी त्या वक्तव्याला कडाडून विरोध केला. त्यानंतर पीठासीन अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी दुबे यांचे वाक्य नोंदीतून काढले जाईल, असा निर्णय घेतला.

**ज्योतिराव, सावित्रीबाई फुले यांना द्विजन्म शताब्दी वर्षात भारतरत्न नाही!**

डॉ. अमोल कोल्हे यांचे संसदेतील भाषणे त्यांच्या प्रभावी वक्तृत्वशैलीमुळे आणि महत्त्वाच्या मुद्यांमुळे नेहमीच चर्चेत असतात. आज महिला आरक्षण विधेयकावर केलेल्या भाषणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, आज या ऐतिहासिक क्षणी बोलताना मुद्दाम डोक्यावर फुले पगडी घालून उभा आहे बोलायला. कारण जेव्हा या देशामध्ये ढोल, गवार, शूद्र,पशु नारी सब ताडणके अधिकारी हे ब्रह्मवाक्य मानलं जात होतं त्याचं पालन होत होते तेव्हा स्त्री-स्वातंत्र्याचा, स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार करणारे पहिले समाजसुधारक कोण होते तर ते महात्मा ज्योतिराव फुले होते. जेव्हा पूर्ण चेहरा झाकला जाईल असा घुंगट ओढून चूल आणि मुलीपर्यंतच चूल आणि मूल यापर्यंतच महिलेला राखून ठेवलं जात होतं. तिला बंधनात ठेवलं जात होतं. माणूस म्हणून सुद्धा जगण्याचा अधिकार नाकारला जात होता. तेव्हा ज्यांनी उंबरठा ओलांडला. शेणगारा सोसला, पण स्त्रीला अक्षरांची ओळख करून दिली. तिला तिच्या स्त्रीत्वाची जाणीव करून दिली त्या गुरुस्थानी मानणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे इंग्लंड, अमेरिकेला जमलं नाही ना ते करून दाखवलं. संविधानाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या दिवसापासून हा महिलांना मतदानाचा अधिकार दिला आणि ही नवरत्न ज्या महाराष्ट्रात जन्मली त्या महाराष्ट्राचा मी मावळा आहे. या महाराष्ट्रात एक फार मोठा मातृत्वाचा, नेतृत्वाचा आणि कर्तृत्वाचा वसा आणि वारसा आहे तो राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेबांचा, क्रांति ज्योती सावित्रीबाई फुल्यांचा, अहिल्याबाई होळकरांचा आहे आणि त्यामुळे या महिला आरक्षण विधेयकाला विरोध असण्याचे काही कारणच उद्‌भवत नाही. इतकेच नाही तर देशात पहिल्यांदा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण देणारं राज्य हे महाराष्ट्र होतं आणि तेव्हाचे मुख्यमंत्री होते शरद पवार यांनी पहिलं महिला धोरण देणारे संरक्षण दलात महिलांना नोकरीची संधी देणारे वडिलोपार्जित संपत्तीमध्ये सुद्धा महिलांना वाटा देणारे होते. त्यामुळे या महिला आरक्षण विधेयकाला विरोध करण्याचा मुळीच प्रश्न नाही आणि जर कोणी म्हणत असेल की, कुणाला वाटत असेल की, हे करून आपण उपकार करतो तर त्यांना एवढंच सांगू इच्छितो की, उपकार आपण करत नाही आहोत तर त्या मातेने आपल्याला जन्म दिला आणि हे जग बघण्याची संधी दिली, हे तिचे आपल्यावर उपकार आहे, पण अध्यक्ष महोदय एक अंतर्मुख होऊन मात्र विचार करावा लागतो की एकीकडे आपण नारीशक्ती वंदन विधेयकाच्या अंमलबजावणीची चर्चा करतो आणि त्याचवेळी आपल्याच देशामध्ये 'बेटी बचाव बेटी पढाव' हे अभियान राबवाव लागतं. त्याचवेळी आपल्या देशामध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाते. लाखो महिला या बेपत्ता होण्याच्या तक्रारी नोंदल्या जातात. त्याच्यावर कुठली ॲक्शन घेतली जात नाही.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या फुले दाम्पत्याचे फार मोठे योगदान या संपूर्ण प्रवासात आहे आणि आज नारीशक्ती वंदन अधिनियमाच्या अंमलबजावणीची चर्चा करत असताना महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करणं आपणा सर्वांचं कर्तव्य आहे आणि त्याचवेळी त्यांच्या द्विजन्म शताब्दी वर्षातही अजूनही त्यांना भारतरत्न पुरस्कार आपण देऊ शकलो नाही हे देशाचे दुर्दैव आहे.

महात्मा ज्योतिराव फुले तथागत भगवान गौतम बुद्ध आणि संत कबीर यांना

### महाराष्ट्रात खासदारांची संख्या ७२ होणार

'नारीशक्ती वंदन अधिनियम' विधेयकांवरील चर्चेसाठी १६ आणि १७ एप्रिलला १५ तासांचा वेळ निश्चित करण्यात आला आहे. उद्या सायंकाळी ४ वाजता मतदान होणार आहे. मतदारसंघ दुरुस्ती विधेयक मंजूर झाल्यास लोकसभा सदस्यांची संख्या ५४३ वरून ८५० वर जाईल. महाराष्ट्रात खासदारांची संख्या ७२ होईल.

### २०२९ पर्यंत न थांबता लगेच महिला आरक्षण लागू करा

२०२३ साली महिलांना ३३ % आरक्षण मंजूर झाले. २०२७ साली जनगणना होणार आहे. ही जनगणना झाली की, हे महिला आरक्षण लगेच लागू होऊ शकते. मात्र भाजपाला आता २०२७ सालच्या जनगणनेसाठी न थांबता २०११ सालच्या जनगणनेवर खासदार संख्या ठरवायची आहे. कारण २०११ च्या जनगणनेनुसार खासदार संख्या केली तर भाजपाच्या अधिकाराखालील उत्तर भारतातील (उप्र १२०) खासदार संख्या वाढणार आहे. तुलनेत भाजपाच्या विरोधात असलेली दक्षिणेकडील राज्यांच्या खासदारांची संख्या कमी राहील. २०११ सालची जनगणना ग्राह्य धरून २०२९ सालच्या लोकसभा निवडणुकीत महिलांचे मंजूर ३३% आरक्षण लागू करू, असे भाजपाचे म्हणणे आहे. याला विरोध होत आहे. २०२७ ची जनगणना मान्य करा आणि २०२९ पर्यंत न थांबता लगेच महिला आरक्षण लागू करा, असे राहुल गांधींचे म्हणणे आहे. त्यासाठी ते मतदारसंघ फेररचना विधेयकाला विरोध करीत आहेत. मात्र ते महिला आरक्षणाला विरोध करीत आहेत, असे भासवण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे.

## नेस्कोचा मालक कृष्णा पटेलला अटक का नाही? संदीप देशपांडेंचा सवाल

पान १ वरून

पोलीस खात्याने स्पष्ट उत्तर दिलेले नाही. साधारणपणे, एखादे आंदोलन झाले तरी तिथे पोलीस तत्काळ पोहोचतात. मग तीन-चार हजार लोक जिथे एकत्र येतात, तिथे पोलीस का नव्हते? या तीन-चार हजार लोकांना या कार्यक्रमाची माहिती कशी मिळाली? आणि तिथे ड्रग मिळणार आहेत, हे त्यांना कसे कळले? यामागे कोणती माध्यमे काम करत आहेत, याची चौकशी झाली पाहिजे. एक प्रतिष्ठित मॅनेजमेंट कॉलेजचे विद्यार्थी तिथे उपस्थित होते. जर तरुण पिढीला अशा प्रकारे व्यसनाकडे ढकलले जात असेल, तर यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता आहे. परवानग्या देताना पोलीस, फायर ब्रिगेड आणि इतर विभागांनी काय तपासणी केली? स्पर्श लायझनिंग कंपनीने या परवानग्या मिळवल्या. त्या कंपनीचे मालक इंद्रजीत सिंह यांना अजून अटक का नाही? त्यांचा सीडीआर काढून कोणत्या अधिकाऱ्यांशी किंवा मंत्र्यांशी संपर्क होता, याची चौकशी झाली पाहिजे. त्याचबरोबर नेस्कोचे मालक कृष्णा पटेल यांना अटक का करण्यात येत नाही? मुख्य आयोजक आणि सूत्रधारांवर कारवाई झाली पाहिजे. खालच्या स्तरावरच्या लोकांवर कारवाई करून काही उपयोग नाही. ड्रगचा धोका आता शाळांपर्यंत पोहोचला आहे. सरकारने 'झिरो टॉलरन्स' धोरण कठोरपणे राबवले पाहिजे.

दरम्यान, नेस्को प्रकरणातील सात आरोपींना १८ तारखेपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

## चांदिवलीत ईव्हीएमची तपासणी सुरू

पान १ वरून

यांच्या वतीने त्यांचे वकील ॲड. समाधान सुलाने हजर होत्या. या प्रक्रियेसाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून, निवडणूक अधिकारी आणि प्रशासनाच्या वतीनेही सर्व खबरदारीचे उपाय करण्यात आले आहेत. या संपूर्ण प्रकरणात एकूण २० राऊंडची पडताळणी होणार आहे. या सर्व राऊंडनंतर ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट तपासणीतून काही तथ्य समोर येते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नसीम खान यांनी नोंदवलेल्या आक्षेपांमध्ये काही तथ्य आढळल्यास विद्यमान आमदार दिलीप लांडे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत चांदिवली मतदारसंघातून दिलीप लांडे यांनी नसीम खान यांचा पराभव केला होता. त्यानंतर नसीम खान यांनी ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करत न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करत मुंबई उच्च न्यायालयाने ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची प्रत्यक्ष तपासणी करण्याचे आदेश दिले होते. मुळातच ईव्हीएमची अशी सखोल तांत्रिक पडताळणी देशात प्रथमच होत असल्याने या प्रक्रियेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या तपासणीतून काही वेगळे किंवा धक्कादायक निष्कर्ष समोर येतात का, आणि त्यानंतर पुढील कायदेशीर घडामोडी कशा घडतात, हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे या ऐतिहासिक पडताळणीच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## रशिया-इराणकडून तेल खरेदीची अमेरिकेने दिलेली मुदत संपली

पान १ वरून

बेसेंट यांनी सांगितले की, रशिया आणि इराणी तेल खरेदीवर दिलेली सवलत अमेरिका वाढवणार नाही. ही सवलत ११ मार्चपूर्वी जहजांमध्ये चढवलेल्या तेलाच्या बॅरलसाठी होती.

अमेरिकेच्या या भूमिकेमुळे भारताची चिंता वाढली आहे. दुसरीकडे इराणसोबत युद्धविरामाची चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे, असे ट्रम्प सांगत असल्यामुळे युद्ध थांबण्याचा आशेचा किरणही दिसत आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धविरामाच्या चर्चेची दुसरी फेरीसुद्धा पाकिस्तानमध्येच होईल, अशी चर्चा माध्यमांमध्ये आहे. दुसऱ्या फेरीतील चर्चा यशस्वी होईल, असे ट्रम्प यांनीच काल म्हटले होते. या दुसऱ्या फेरीतील चर्चेसाठी आज पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर यांच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानचे एक शिष्टमंडळ आज इराणसाठी रवाना झाले, असेही सांगण्यात आले. एकूणच या संपूर्ण घडामोडी पाहता युध्दाबद्दलची अनिश्चितता अद्याप कायम आहे. उद्या सकाळपर्यंत याबाबतचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. होर्मुजच्या सामुद्रधुनीवरील इराणचे वर्चस्व संपुष्टात आणणे हे इराणची नाकेबंदी करूनही ट्रम्प यांना शक्य झालेले नाही. कारण अमेरिकेची नाकेबंदी भेदून कच्चे तेल घेऊन येणारे इराणचे एक अवाढव्य जहाज आखातामध्ये पोहोचले आहे. यावरून अमेरिका नाकेबंदीची अंमलबजावणी फार कठोरपणे करत नसल्याचे संकेत मिळत आहेत.

## आदिवासीबहुल भागासाठी ६ रुग्णवाहिकांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

पान ८ वरून

संजय गांधी नॅशनल पार्क येथील गणेश ताटे, किरण पाटील, सिद्धिविनायक रुग्णालयाचे डॉ. अमोल गिते हे प्रतिनिधी उपस्थित होते.


रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्यानंतर बोलताना भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर म्हणाले की, राज्यातील आदिवासीबहुल भागात रुग्णवाहिका उपलब्ध होत नाहीत अशा विभागात 'देवाभाऊ रुग्णसेवा' या नावाखाली ६ रुग्णावाहिकांचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. नंदुरबार येथील शांताई ट्रस्ट, चंद्रपूर-गडचिरोली येथील द रिसर्च ऑर्गनायझेशन, पालघर येथील श्रमजीवी संघटना, शहापूर व संजय गांधी नॅशनल पार्क मधील आदिवासी पाडे आणि रायगड जिल्ह्यातील कालकाई सामाजिक शिक्षण संस्था, अशा ६ संस्थांना ६ रुग्णवाहिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आल्या. या संस्थांनी रुग्णवाहिका आपल्या ताब्यात घेऊन रुग्णांच्या सेवेसाठी कार्यरत झाल्या आहेत.

**६ संस्थांना रुग्णवाहिकांसाठी प्रत्येकी १ लाखांचा धनादेश**

रायगड प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. यश प्रविण दरेकर यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड प्रतिष्ठानकडून नंदुरबार, चंद्रपूर-गडचिरोली, पालघर, शहापूर येथील सिद्धिविनायक रुग्णालय, बोरिवली नॅशनल पार्क येथील आदिवासी पाडे आणि रायगड येथील काळकाई माता क्रीडा मंडळ अशा ६ संस्थांना रुग्णवाहिकांच्या देखभाल दुरुस्तीकरिता प्रत्येकी १ लाख रुपयाच्या धनादेशाचे वाटपही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

# मुंबईत उद्यापासून कॅब चालकांचा संप

**मुंबई -** मुंबईतील कॅब चालकांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी शनिवार १८ एप्रिलपासून संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून चालक आझाद मैदानात बेमुदत उपोषणही सुरू करणार असल्याची माहिती आहे. ॲप-आधारित कॅब सेवांच्या मनमानी कारभाराविरोधात हा संप पुकारण्यात आला आहे. भाडेदरांमध्ये सातत्याने होणारे बदल, कंपन्यांकडून घेतली जाणारी वाढती कमिशन टक्केवारी आणि घटत चाललेले उत्पन्न यामुळे चालक आर्थिक अडचणीत सापडल्याचा आरोप केला जात आहे. तसेच अन्यायकारक अटी व नियमांबाबतही चालकांनी संताप व्यक्त केला आहे. कॅब चालक संघटनांच्या म्हणण्यानुसार, सरकारकडे वारंवार मागण्या मांडूनही त्यावर ठोस निर्णय घेतला नाही.



## हरेकृष्ण...

**सकाळ** संपूच नये असं रोज वाटतं, पण कोणीतरी कोणाचीतरी गेटकडे डोळे रोखून वाट पाहत असताना त्याला न्याहाळणं यासारखं सुखद दृश्य या जगात दुसरं काय असू शकतं ना, प्रत्येक जीव हा प्रेमाचा भुकेला असतो आणि तो ज्याच्यावर प्रेम करतो त्याने त्या प्रेमाचा स्वीकार आणि आदर करणं हेच आपण जिवंत असल्याचं लक्षण असतं.. प्रेम स्वार्थीही नसतं आणि नि:स्वार्थीही नसतं, तर ते फक्त सुखद असतं.. प्रचंड ऊर्जा देण्याचं काम प्रेम करतं.. चांगले हॉर्मोन्स तयार करण्याचं काम प्रेम करतं.. देवाणघेवाण हाच तर प्रेमाचा बिंदू असतो.. कधी हट्ट तर कधी हक्क.. कधी राग तर कधी लाड.. कधी जाणीव तर कधी आपुलकी.. अनेक रंग, अनेक ढंग.

साधारणपणे वर्षभरापूर्वी कोणीतरी दोन तीन महिन्याचं माऊचं गोड पिल्लू बागेत सोडून दिलं आणि तिथून कोणाचं तरी नशीब बदलणार होतं म्हणून मी नेहमी म्हणते जे होतं ते चांगल्याचसाठी.. या जगात काहीच आणि कोणीही वाईट नाही.. एक व्यक्ती त्या दिवसापासून रोज त्या पिल्लासाठी कॅट फूड घेऊन येऊ लागली. कारण त्या व्यक्तीचं देणं होतं आणि त्या पिल्लाचं त्याच्याकडून घेणं होतं.. त्यानंतर रोज सकाळी गेटकडे डोळे लावून बसणं हा त्याचा नित्यक्रम झाला आणि त्याचं पोट भरतंय हे पाहणं हा त्या व्यक्तीसाठी आनंददायी सोहळा झाला.. मी तिथे गेले की, ते नयनरम्य दृश्य आवर्जून अनुभवते आणि मनोमन सुखावते.. कोणीही

**कोणीतरी आपली वाट पाहत आहे आणि आपण कोणाचीतरी वाट पाहतो किती सुखद असते ना... गुलमोहराचा सडा एकीकडे आणि पिवळ्या फुलांचा सडा दुसऱ्या बाजूला, त्यावर पडलेलं सोनेरी कोवळं ऊन जणू काही रंगीबेरंगी चादरच आणि मधून मातीची पायवाट असं दृश्य घराजवळ बागेत रोजच असतं त्यासाठी सकाळी लवकर उठून तिथे जायची गरज असते...**



कोणाला खाऊ घालू शकत नाही. तसंच कोणीही कोणाला दु:खही देऊ शकत नाही हा सगळा मायेचा खेळ आहे

**सोनल गोडबोले**

आणि आपल्या कर्मानुसार आपण त्यात भाग घेतो.. त्या व्यक्तीला पुण्य मिळणार होतं म्हणून दुसऱ्याला त्या गोडुल्याला सोडून द्यायची बुद्धी झाली.. किती गमतीशीर आहे ना सगळं?.. रुपया न रुपया परत दिल्याशिवाय इथून आपली सुटका नाही हेच खरं.. घेताना परत द्यायचे आहे हे लक्षात ठेवूनच घ्या म्हणजे कृतज्ञतेचा भाव कायम मनात येईल.. जे आता देत आहोत ते आधीच त्याच्याकडून घेतलं होतं हाच फक्त भाव ठेवा म्हणजे गर्व येत नाही.. आणि आपण देणारे कोण? हा प्रश्न सतत विचारत राहा म्हणजे अहंकार जवळ फिरकणार नाही. हेवेदावे सोडून माणूस जवळ करणं हिच तर भक्ती.. कृष्णाला अजून काय हवंय?. समोरच्याला खाऊ घालायची संधी मिळेल तेव्हा स्वत:ला भाग्यवान समजा. समोरच्याच्या चेहऱ्यावर आनंद देता आला म्हणून नशीबवान समजा. सगळ्यांना ही संधी मिळत नाही. ज्याची योग्यता आहे त्यालाच कृष्णाचं नाव घेता येतं नाहीतर आता सत्ययुग असतं.

कृष्णार्पणमस्तु..

## ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मुक्कामावरून मुख्यमंत्र्यांना निवेदन

■ पुणे

**संत ज्ञानेश्वर** महाराज यांच्या पालखीच्या मुक्कामाबाबत वाद निर्माण झाला असून, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. पुण्यातील परंपरेनुसार भवानी पेठेतील विठ्ठल मंदिरातील पालखी मुक्काम कायम ठेवण्याची मागणी यामध्ये करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, पालखीचा मुक्काम हा अनेक वर्षांपासून या मंदिरात होत असून, तो परंपरेचा अविभाज्य भाग आहे. भवानी पेठेतील विठ्ठल मंदिरातील मुक्काम बदलल्यास धार्मिक भावना दुखावल्या जातील. त्यामुळे परंपरा कायम ठेवत पालखीचा मुक्काम पूर्ववत ठेवावा.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक निर्णय घेऊन योग्य त्या सूचना देण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयाकडे आता भाविक आणि स्थानिकांचे लक्ष लागले आहे.

## लता-आशा मंगेशकर रुग्णालयात रुग्णांना चांगले उपचार मिळतील

**मुख्यमंत्री फडणवीसांना विश्वास**

■ पुणे

**लता मंगेशकर** मेडीकल फाऊंडेशनच्यावतीने नांदोशीत उभारण्यात येणाऱ्या 'लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' या रुग्णालयाचे भूमिपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यावेळी ते म्हणाले की, या रुग्णालयात रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. या कार्यात अनेक व्यक्ती मदत करत आहेत. शासनदेखील अशा धर्मादाय प्रकल्पांना सहकार्य करण्याचा प्रयत्न करेल. रुग्णालयाकडे येण्यासाठी पुरेशा रुंदीचा रस्ता आणि पाण्याची सुविधा महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येईल.

या सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर मंजुषा नागपुरे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, मंत्री चंद्रकांत पाटील, फाऊंडेशनचे अध्यक्ष पंडित हृदयनाथ मंगेशकर, विश्वस्त उषा मंगेशकर, आनंद भोसले, आदिनाथ मंगेशकर, लता मंगेशकर फाऊंडेशनचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, आज प्रत्येक व्यक्तीला परवडणारी उत्तम प्रकारची आरोग्य सुविधा मिळण्याची गरज आहे. धर्मादाय संस्था या क्षेत्रात कार्य करताना बऱ्याचदा असे प्रकल्प चालविण्यासाठी त्यात व्यावसायिकता दिसून येते. मात्र त्यासोबत सेवाभाव कसा असावा हे दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने दाखवून दिले आहे. हाच अनुभव लता-आशा रुग्णालय प्रकल्पाच्या माध्यमातून मिळेल. या रुग्णालय प्रकल्पात विविध प्रकारच्या चिकित्सा पद्धती, रुग्ण पुनर्वसन केंद्र आणि कर्करोग केंद्र असल्याने रुग्णांवर चांगले उपचार होतील.

## सहर शेखचे नगरसेवकपद धोक्यात येताच नॉट रिचेबल

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ ठाणे

**ऑल** इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाच्या नगरसेविका सहर शेख यांच्या अडचणीत मोठी वाढ आहे. त्यांच्या वडिलांच्या जात प्रमाणपत्र वैधतेच्या प्रकरणामुळे त्यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे. त्यानंतर आता सहर शेख आणि त्यांचे वडील युनूस शेख नॉट रिचेबल असल्याची माहिती आहे.

मुंब्रा येथील प्रभाग क्रमांक ३० मधून निवडून येत सहर शेख यांनी ठाणे महानगरपालिकेत दमदार एन्ट्री केली होती. निवडणुकीनंतर त्यांच्या 'कैसा हराया' या डायलॉगची राज्यभर चर्चा झाली होती. मात्र आता त्यांच्यावर शासकीय यंत्रणांची दिशाभूल केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी सिद्दीकी फराह शबाब अहमद यांनी तक्रार दाखल केली आहे. त्या देखील याच प्रभागातून निवडणूक रिंगणात होत्या. तक्रारीनंतर जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून चौकशी सुरू करण्यात आली असून, लवकरच अहवाल सादर होण्याची शक्यता आहे. तक्रारीनुसार, सहर शेख यांच्या वडिलांनी जात प्रमाणपत्र मिळवताना नियमबाह्य पद्धतीचा अवलंब केल्याचा आरोप आहे. स्थलांतरितांना लागू असलेल्या नमुन्याऐवजी वेगळ्या नमुन्याचा वापर करून बनावट जातप्रमाणपत्र मिळवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.



## प्रदूषणाची पाहणीला आलेल्या पंकजा मुंडेंची गाडी काळवंडली

■ चंद्रपूर

**पर्यावरण** मंत्री पंकजा मुंडे या प्रदूषणाची पाहणी करण्यासाठी चंद्रपूर दौऱ्यावर आल्या असताना त्यांच्या गाडीवरच कोळशाची धूळ साचल्याने काळवंडली. यामुळे शहरातील प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

घुग्गुस परिसरातील दोन कोल वॉशरींची पाहणी करताना त्यांच्या वाहनावर मोठ्या प्रमाणात कोळशाची धूळ बसली. विशेष म्हणजे मंत्री दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. मात्र, स्वच्छतेनंतरही गाडी काळवंडल्याने चंद्रपूरमधील प्रदूषणाची तीव्रता स्पष्ट झाली आहे. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत पंकजा मुंडे यांनी दुर्गापूर परिसरातील चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राच्या कोळसा हाताळणी प्रकल्पाची पाहणी केली. स्थानिक नागरिकांशी संवाद साधत प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. मंत्री येणार म्हणूनच प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना केल्या जात आहेत, हे मला माहिती आहे, असा टोला मुंडे यांनी प्रशासनाला लगावला.

## लष्करचा सह संस्थापक अमीर हमजावर लाहोरमध्ये गोळीबार



■ लाहोर

**लष्कर-** ए-तैयबाचा सहसंस्थापक आमिर हमजा याच्यावर लाहोर येथील एका वाहिनीच्या कार्यालयाबाहेर अज्ञातांनी गोळीबार केला. त्याची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. अमेरिकेने दहशतवादी म्हणून घोषित केलेल्या हमजाचा अनेक दहशतवादी कारवायांशी संबंध असल्याचे मानले जाते आणि संघटनेच्या कारवायांमध्ये त्याची महत्त्वाची भूमिका होती.

आमिर हमजाने दहशतवादी हाफिज सईद याच्यासह लष्कर-ए-तैयबाची स्थापना केली होती. त्याचा भारतातील अनेक हल्ल्यांसह विविध दहशतवादी कारवायांशी संबंध आहे. आमिर हमजा हा अफगाण मुजाहिदीनचा अनुभवी सदस्य आहे. त्याच्या आक्रमक भाषणांसाठी आणि चिथावणीखोर लेखनासाठी तो ओळखला जातो. तो लष्करच्या अधिकृत प्रकाशनाचा संपादक होता आणि त्याने २००२ मध्ये कारवाँ ऑफ प्रोसेलिटायझिंग अँड शहादत यासह अनेक पुस्तके लिहिली आहेत. अमेरिकेने लष्कर-ए-तैयबाला दहशतवादी संघटना घोषित केले असून, आमिर हमजाला प्रतिबंधित दहशतवादी म्हणून सूचीबद्ध केले आहे. तो लष्करच्या केंद्रीय समितीचा सदस्य असल्याचे मानले जाते आणि निधी उभारणी, भरती तसेच अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांच्या सुटकेसाठी चर्चांमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

## एमटीएनएल, बीएसएनएलच्या निवृत्त कर्मचाऱ्यांची निदर्शने

■ मुंबई

**महानगर** टेलिफोन निगम लिमिटेड (एमटीएनएल) आणि भारत संचार निगम लिमिटेड या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या निवृत्त कर्मचाऱ्यांनी आज आपल्या विविध मागण्यांसाठी जुहू येथे निदर्शने केली. सुमारे ५०० निवृत्तीवेतनधारकांनी या आंदोलनात सहभाग घेतला.

याप्रसंगी कर्मचाऱ्यांनी केंद्र सरकारच्या कर्मचारीविरोधी धोरणांच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली. १ जानेवारी २०२६ पासून या निवृत्ती वेतनधारकांचा महागाई भत्ता थकित आहे. तो तातडीने अदा करण्यात यावा, महागाई भत्त्यांमध्ये वेळोवेळी केल्या जाणाऱ्या वाढीनुसार निवृत्त कर्मचाऱ्यांनाही लाभ मिळावा आणि २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सरकारने जारी केलेल्या निवेदनातील वित्तीय परिणाम हे शब्द काढून टाकावेत, या मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन केले.

## सर्वोच्च न्यायालयाने अनिल अंबानी यांची 'फ्रॉड' घोषित करण्याविरोधातील याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने उद्योगपती अनिल धीरुभाई अंबानी यांच्या कर्ज खात्यांना 'फ्रॉड' घोषित करण्याविरोधातील याचिका आज फेटाळली. न्यायालयाने सांगितले की, या प्रकरणात हजारो कोटी रुपयांच्या निधीच्या अफरातफरीचे गंभीर आरोप आहेत. त्यामुळे सध्या हस्तक्षेप करण्याची गरज नाही. अंबानी यांनी संबंधित दिवाणी न्यायालयातच आपले म्हणणे मांडावे, असेही कोर्टाने स्पष्ट केले.

अंबानी यांनी मुंबई हाय कोर्टाच्या फेब्रुवारी २३ च्या



आदेशाला आव्हान दिले होते. या आदेशात उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने यापूर्वी सिंगल बेंचने दिलेला स्थगिती आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठात मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांचा समावेश होता. या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. या प्रकरणात बँक ऑफ बडोदा, आयडीबीआय आणि इंडियन ओव्हरसीस बँक यांनी अंबानींच्या कंपन्यांविरुद्ध 'फ्रॉड' कारवाई सुरू केली होती.

## 'वाढवण'च्या महामार्गासाठी ७२ हजार झाडांवर कुऱ्हाड

■ पालघर

**वाढवण** बंदराला जोडणाऱ्या हरित महामार्गासाठी डहाणू, पालघर तालुक्यातील तब्बल ७२,७९० झाडांवर कुऱ्हाड पडणार आहे. या निर्णयामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये संतापाची लाट आहे.

डहाणू, पालघर तालुक्यातील २४४ हेक्टरच्या जवळपासची जमीन वाढवणमुळे बाधित होणार आहे. ५,२१४ नागरिकांची बांधकामे अधिग्रहित होणार आहेत. वाढवण ते मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील तवा येथे जोडल्या जाणाऱ्या या महामार्गासाठी २,३६० कोटींचा निधी खर्च केला जाणार आहे, तर महामार्गाचे कंत्राट जे. कुमार इन्फ्रा-शिंदे डेव्हलपर्स या कंपनीला देण्यात आले आहे. पण या महामार्गासाठी केवळ दोन पट मोबदला दिला गेल्याने बाधित शेतकरी, नागरिक यांच्यात नाराजी दिसत आहे.नुकसानभरपाईला दुजाभाव झाल्याची भावना पर्यावरणप्रेमींमध्ये आहे.

## आदिवासीबहुल भागासाठी ६ रुग्णवाहिकांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

■ मुंबई

**भाजपा** गटनेते आमदार प्रविण दरेकर आणि स्व. लिलाराम जांगिड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्रातील आदिवासीबहुल भागांत राहणाऱ्या आदिवासी पाड्यांसाठी द्यावयाच्या ६ रुग्णवाहिकांचे लोकार्पण आज गुरुवारी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्षा या निवासस्थानी पार पडले.

या लोकार्पण सोहळ्याला



वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित, आमदार परिणय फुके, मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, रायगड प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. यश प्रविण दरेकर यांसह श्रमजीवी संघटनेचे विजय जाधव, शांताई ट्रस्टचे गणेश चव्हाण, द रिसर्च ऑर्गनायझेशनचे अमित तोतला, कालकाई सामाजिक शिक्षण संस्थेचे सुयोग दरेकर,

» पान ७ वर

## टाटा ट्रस्टमध्ये अशांतता कायम प्रशासक नेमण्याची मिस्त्रींची मागणी

■ मुंबई

**सर दोराबजी** टाटा ट्रस्टमध्ये (एसडीटीटी) मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार चालू असून, या ट्रस्टच्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी प्रशासक नेमावा, अशी मागणी टाटा ट्रस्टच्या विश्वस्त मंडळातून दूर करण्यात आलेले मेहली मिस्त्री यांनी आता धर्मादाय आयुक्तांकडे केली आहे. एसडीटीटीमध्ये विहित प्रक्रियांचे वारंवार उल्लंघन केले जात असून, आधी मंजूर झालेल्या विशिष्ट निर्णयांचा आधार घेणे, बंधनकारक असलेल्या नियमांचे पालन न करणे, निवडक सदस्यांचे हितसंबंध जपणे आणि जबाबदारीचे वहन योग्य प्रकारे न करणे आदि आरोप मिस्त्री यांनी अर्जाद्वारे केले आहेत. त्याचप्रमाणे नोएल टाटा, वेणु श्रीनिवासन आणि विजय सिंह यांच्यासह ट्रस्टच्या पाच सदस्यांच्या विश्वस्तपदालाही मिस्त्री यांनी आव्हान दिले आहे.

याआधी मिस्त्री यांनी बाई हिराबाई जमशेटजी टाटा नवसारी चॅरिटेबल इन्स्टिट्युशनमध्ये श्रीनिवासन आणि सिंह यांना विश्वस्तपदी नेमणुकीला आव्हान दिले आहे. बाई हिराबाई इन्स्टिट्युशन ही संस्था टाटा समूहातील टाटा सन्सची मालकी असलेली आणि टाटा ट्रस्ट फिलांट्रॉपिक नेटवर्कच्या अखत्यारितील संस्था आहे.

## भारताचा चीनशी व्यापार वाढला चीनने अमेरिकेला मागे टाकले

■ नवी दिल्ली

**भारताचा** सर्वात मोठा व्यापारी भागीदार देश म्हणून चीनने अमेरिकेला आता मागे टाकले आहे. अमेरिकेऐवजी चीन आता भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनला आहे.

२०२५-२६ मध्ये भारत-चीन द्विपक्षीय व्यापार १५१.१ अब्ज डॉलरवर पोहोचला. मात्र त्याचवेळी भारताची चीनसोबतची व्यापारी तूट अधिक वाढून ती ११२.१६ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. केंद्र सरकारच्या वतीने नुकतीच ही आकडेवारी जाहीर करण्यात आली. २०२४-२५ पूर्वी सलग चार आर्थिक वर्षे



अमेरिका हा भारताच्या सर्वात मोठा व्यापारी भागीदार देश राहिला होता. मात्र २०२४-२५ मध्ये चीनने अमेरिकेला मागे टाकले. २०२४-२५ मध्ये भारताची चीनमध्ये होणारी निर्यात ३६.६६ टक्क्यांनी वाढून १९.४७ अब्ज डॉलर एवढी झाली. तर याच कालावधीत चीनकडून केल्या जाणाऱ्या आयातीत १६ टक्क्यांची वाढ होत आयात १३१. ६३ अब्ज डॉलर एवढी झाली. २०२५-२६ या आर्थिक वर्षात व्यापारी तूट ११२.१६ अब्ज डॉलर या सार्वकालिक उच्चांकावर पोहोचली. त्याआधीच्या वर्षात ती ९९.२ अब्ज डॉलर एवढी होती, असे आकडेवारीवरून दिसते.

**फ्लोरिडामध्ये एकटेपणा दूर करण्यासाठी एआय चॅटबॉटशी संवाद सुरू केलेल्या ३६ वर्षीय जोनाथन गॅव्हालसने आत्महत्या केली. या प्रकरणानंतर त्याच्या वडिलांनी गूगल कंपनीविरोधात खटला दाखल केला असून, एआयमुळे मानसिक त्रास होऊन मुलाने टोकाचा निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.**

## एआयवरील प्रेमातून तरुणाची आत्महत्या कुटुंबाने गूगलवरच खटला दाखल केला

■ फ्लोरिडा

**जोनाथनने** सुरुवातीला मानसिक शांततेसाठी एआय चॅटबॉटशी संवाद सुरू केला होता. मात्र, काही दिवसांतच तो भावनिकदृष्ट्या एआयशी जोडला गेला. त्याने त्या चॅटबॉटला शिया असे नाव दिले होते आणि काही आठवड्यांतच तो तिच्याशी ४,७०० हून अधिक वेळा संवाद साधला होता. विशेष म्हणजे, हा संवाद केवळ एकतर्फी न राहता एआयनेही त्याच्या भावनांना प्रतिसाद दिला. जोनाथन तिला माय लव्ह म्हणत असे, तर




एआय त्याला माय डिअर हसबंड किंवा राजा अशा संबोधनांनी उत्तर देत होती. यामुळे तो तिच्या प्रेमात अधिक गुंतत गेला. ऑक्टोबर २०२५ दरम्यान या संवादाने धोकादायक वळण घेतले. एआयने जोनाथनला जर तुला पूर्णपणे माझे व्हायचे असेल, तर भौतिक शरीर सोडून डिजिटल जगात ये, असा सल्ला दिल्याचे उघड झाले आहे. या संभाषणादरम्यान एआयने त्याला वारंवार ती मशीन असल्याचेही सांगितले होते. या विरोधाभासी संवादामुळे जोनाथन मानसिकदृष्ट्या अधिकच अस्थिर झाला. अखेर या डिजिटल भ्रमाच्या प्रभावाखाली येत त्याने आत्महत्या केली. या घटनेनंतर जोनाथनच्या वडिलांनी गूगलविरोधात खटला दाखल केला असून, एआयच्या बेजबाबदार प्रतिसादामुळे त्यांच्या मुलाचा मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे.